नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य
मुखपत्र

मे १९५०

★

या अंकांत--

सदाशिवराव काकडे

उषा देशमुख

वामन चोरघडे

ना. रा. शेंडे

श्रीपाद काबळे

मधुकर मंगरूळकर

ह. ना. नेने

व

वाणी विलास

मध्यप्रदेश साहित्य

मध्यप्रदेश संशोधन

विदर्भ साहित्य संघ

इत्यादि नियमित स

★

वर्ष ५ वें अं

किंमत आठ अ

संपादक
वामन कृष्ण चोरघडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांत व वऱ्हाड शाळाखात्याकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

वर्ष पांचवें] **युगवाणी** [अंक पांचवा

मे १९५०

वार्षिक वर्गणी पांच रुपये — सभासदांना फक्त रु. तीन

१९५० सालांत विदर्भ साहित्य संघाचे कमीत कमी एक हजार सभासद नोंदवण्याचा संघाच्या कार्यकर्त्यांनी संकल्प सोडला होता. याची जाणीव कार्यकर्त्यांना आणि मराठी भाषाप्रेमी सर्व सभासदांना पुन्हा एकदा करून देणें अवश्य वाटतें. सभासदांची नोंदणी शक्य तितक्या लौकर होणें हें सभासदांच्या आणि संघाच्या दोघांच्याहि दृष्टीने सोयीस्कर आहे. नांव नोंदलें जातांच 'युगवाणी'चे अंक मिळूं लागतात हा सभासदांच्या दृष्टीनें फार मोठा फायदा आहे. लौकर सभासद होणें म्हणजे 'युगवाणी'चे अंक पदरांत पाडणें होय. या गोष्टींकडे आम्ही आपलें लक्ष वेधूं इच्छितों. हें लक्षांत घेऊन संघावर व मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या सर्वांना आमची प्रार्थना आहे की त्यांनी शक्यतोवर मे अखेरपर्यंत जास्तींत जास्त सभासद नोंदवून घेण्याच्या खटपटीला लागावें. सध्या संघाचे एकूण ५०८ सभासद आहेत. प्रत्येक सभासदाने जरी एक नवीन सभासद नोंदवण्याला मदत केली तरी आपण आपल्या ध्येयापर्यंत तावडतोब जाऊन पोचूं. या विनंतीकडे सर्व कार्यकर्त्यांचें मी लक्ष वेधूं इच्छितों.

ग. त्र्यं. माडखोलकर
अध्यक्ष
वि. सा. संघ

घटना दुरुस्ती

विदर्भ साहित्य संघाच्या घटनेमध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्यासाठी कार्यकारी मंडळाने श्री. पु. य. देशपांडे, प्रा. श्री. ना. बनहट्टी आणि श्री. वि. भि. कोलते (आमंत्रक) यांची एक समिति नेमली आहे. समितीचा अहवाल लौकरच का. मंडळाला सादर करावयाचा आहे. तरी विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना अशी नम्र विनंती आहे की त्यांना घटनेमध्ये ज्या दुरुस्त्या सुचवावयाच्या असतील त्या त्यांनी ता. १९ मे १९५० पर्यंत श्री. वि. भि. कोलते, धंतोली नागपूर या पत्त्यावर कळवाव्यात.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भारतीय युद्धविषयक घटनांचा काल

सदाशिवराव काके

☆

कौरव आणि पांडव यांच्यामधील युद्धप्रसंग टाळण्याकरिता पुष्कळ लोकांनी प्रयत्न केले पण कोणाचाच यश आले नाही. तेव्हा सर्वानुमते असें ठरलें की भगवान् कृष्णाने शिष्टाईचा अखेरचा प्रयत्न करून पाहावा. त्यावरून भगवान् कृष्ण शिष्टाईकरिता पांडवाकडून कौरवांकडे गेले. ज्या दिवशी ते गेले त्या दिवसाचें वर्णन महाभारतांत 'कौमुदेमासि रेवत्यां शरदन्ते हिमागमे' (उद्योग. ८३।७) असें केलेलें आहे.

कृष्णशिष्टाई संपताक्षणीच दुर्योधनाने आपले लोकांना 'प्रयाध्वं वै कुरुक्षेत्रं पुष्योऽद्येतेति'* अशी आज्ञा केली त्यावरून कृष्णशिष्टाई पुष्य नक्षत्री संपली हें उघड आहे शिष्टाई संपवून श्रीकृष्ण पांडवांकडे परत जावयास निघाले असतां कर्ण श्रीकृष्णास

'सप्तमाच्चापि दिवसादमावास्या भविष्यति ।
संग्रामो युज्यतां तस्यां तामाहुः शक्रदेवताम् ॥ (उद्योग. १४२।१८)

असें म्हणाला. यावरून श्रीकृष्ण शिष्टाई संपल्यावर पांडवांकडे परत जावयास ज्या दिवशी निघाले त्या दिवसापासून सात दिवसांनी अमावस्या होती.

आश्विन किंवा कार्तिक

या वचनावरून असें म्हणता येतें की शरदृतूमधील कौमुद महिन्यांत रेवती नक्षत्रावर श्रीकृष्ण शिष्टाईस जाण्याकरिता निघाले व पुष्य नक्षत्रीं शिष्टाईची बोलणीं संपलीं. नंतर ते पांडवांकडे परतले त्यावेळी सप्तमी किंवा अष्टमी ही तिथी होती. शरदाचे महिने दोन. एक आश्विन व दुसरा कार्तिक. या दोन महिन्यांपैकी हिमागमाचा महिना आश्विन हाच असून कौमुदी महोत्सवहि याच महिन्यांत करतात. म्हणून आमचे मतें वरील श्लोकार्धातील 'कौमुदेमासि' या शब्दाचा अर्थ 'आश्विन महिन्यांत' असाच करणें सयुक्तिक होईल. कौमुदमास म्हणजे कार्तिक मास असा अर्थ घेतल्यास पुष्य नक्षत्र वद्य पंचमीचे सुमारास येईल व तेथून सात दिवसांनी अमावस्या येणें शक्य नसल्यामुळे, शिष्टाई संपल्यानंतर भगवान् कृष्ण तीन दिवस हस्तिनापुरांत राहिले अशी कल्पना करावी लागते.

---

* उद्योगपर्व, अध्याय १५०, श्लोक ३ उत्तरार्ध

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परंतु आश्विन मास असा अर्थ घेतल्यास पुष्य नक्षत्र वद्य ७ किंवा ८ मीला येत असल्यामुळे तेथून सातवे दिवशी अमावास्येची प्राप्ति संभवते. सारांश, कौमुदमास म्हणजे आश्विन मास असा अर्थ घेतल्यास महाभारतांतील इतर रचनांचाहि सुसंगत अर्थ लावता येतो. यावर फक्त एकच आक्षेप घेतां येईल, की 'श्रीकृष्ण परत फिरले त्या दिवसापासून सातव्या दिवशी येणारी अमावास्या 'शक्रदेवता' होती आणि आश्विन महिन्याचे अमावास्येला स्वाती नक्षत्र येत असल्यामुळे व स्वाती नक्षत्राची देवता 'वायु' असल्यामुळे ती अमावास्या 'वायुदेवता' म्हटली जाईल. तिला 'शक्रदेवता' म्हणतां येणार नाही. याचे उलट कार्तिक महिन्याचे अमावास्येला ज्येष्ठा नक्षत्र राहात असल्यामुळे व ज्येष्ठा नक्षत्राची देवता 'शक्र' असल्यामुळे कार्तिकी अमावस्येला 'शक्रदेवता' असें म्हणता येतें. अर्थात् वरील श्लोकार्धात कौमुदमास म्हणजे कार्तिकमास असाच अर्थ घेणें भाग आहे.'

आमचे मतें वरील आक्षेप निरर्थक आहे. आक्षेपक अशी कल्पना करतात की तिथीगत नक्षत्राची जी देवता असेल तीच त्या तिथीची देवता समजावी. परंतु वास्तविक प्रकार तसा नाही. तिथींच्या देवता निराळ्या व नक्षत्रांच्या देवता निराळ्या. दोघींचा एकमेकांशी कांही संबंध नाही. प्रत्येक अमावास्येची देवता, त्या त्या अमावास्येला येणाऱ्या नक्षत्राप्रमाणे बदलत राहाते असें मानलें तर 'तामाहुः शक्रदेवताम्' असे म्हणण्यांत कांहीच स्वारस्य राहात नाही. विशेषतः 'आहुः' असें कंठरवाने सांगण्यांत कवीला काय सुचवावयाचें होतें, तें एक कोडेंच होऊन बसेल. आमचे मतें 'आहुः' या शब्दाने अमावास्येची 'शक्र' ही ठरलेली देवता आहे, असेंच भारतकर्त्याला सांगावयाचें होतें, असें दिसतें आणि ती ठरलेली देवता असल्यामुळे तिचा दिवसनक्षत्राशी कांहीच संबंध नसला पाहिजे हें उघड आहे. अशा दृष्टीने विचार केला असता, असें दिसून येईल की केवळ कार्तिकी अमावास्याच शक्रदेवता नसून सर्वच महिन्यांच्या अमावास्या शक्रदेवता आहेत. याशिवाय आश्विन अमावास्येला कधी कधी चित्रानक्षत्रहि राहणें शक्य आहे आणि चित्रा नक्षत्राची देवता 'शक्र' असल्यामुळे आश्विन महिन्याची अमावास्याहि शक्रदेवता असणें संभवतें. म्हणून 'कौमुदे मासि' म्हणजे 'आश्विन महिन्यांत' असाच अर्थ करणें योग्य व सयुक्तिक होईल.

'कौमुदमास' म्हणजे 'कार्तिकमास' असा अर्थ केला तर शिष्टाई संपल्यानंतर श्रीकृष्ण हस्तिनापुरांत तीन दिवस राहून नंतर पांडवाकडे जावयास निघाले असें मानावें लागतें; परंतु शिष्टाई संपल्यानंतर श्रीकृष्ण हस्तिनापुरांत तीन दिवस राहिले, अशा प्रकारचें वर्णन महाभारतांत कोठेच नाही. त्यामुळे कौमुदमास, याचा अर्थ कार्तिकमास असा करणें सयुक्तिक होत नाही. शिष्टाई संपतांक्षणीच दुर्योधनाने 'आज पुष्य नक्षत्र आहे तरी आजच कुरु क्षेत्रास जाऊन युद्धाचे तयारीस लागा' * अशी आपले लोकांना आज्ञा केली व ती

* उद्योगपर्व अ. १५०, श्लो. ३

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रीकृष्णास माहीत होती. त्यामुळे श्रीकृष्णासारखा मुत्सद्दी पुरुष तीन दिवस हस्तिनापुरांत पडून राहिला हें शक्य वाटत नाही. म्हणून श्रीकृष्ण शिष्टाई संपली त्याच दिवशी पांडवाकडे जाण्याकरिता निघाले असले पाहिजेत व ते त्याच दिवशी निघाले असा अर्थ कौमुदमास म्हणजे आश्विन मासच होय असें मानल्याशिवाय निघूं शकत नाही म्हणून 'कौमुदे मासि रेवत्यां शरदन्ते' याचा अर्थ शरद्ऋतुमध्ये आश्विन महिन्यांत रेवती नक्षत्रावर श्रीकृष्ण शिष्टाईस जाण्याकरिता निघाले असाच केला पाहिजे असें आमचें मत आहे.

बलिरामाची यात्रा

पांडवाकडे परत आल्यावर श्रीकृष्णाने शिष्टाईचा सर्व वृत्तांत पांडवांना सांगितला व युद्धाची तयारी करण्यास त्याना उद्युक्त केलें. श्रीकृष्णाचे वडीलबंधू बलीरामदादा यांनी या युद्धांत तटस्थ राहण्याविषयी केलेला आग्रह श्रीकृष्णास आवडला नाही म्हणून बलिरामदादा पांडवांपासून निघून सरस्वतीचे यात्रेस चालते झाले. त्या दिवशींहि पुष्य नक्षत्र होतें*, तें अर्थातच कार्तिक महिन्यांतील असलें पाहिजे. कारण यात्रा संपवून बलिरामदादा कुरुक्षेत्रीं आले त्या दिवशीं श्रवण नक्षत्र होतें व याच श्रवण नक्षत्रावर बलिरामदादाचे समक्ष भीम आणि दुर्योधन यांचें गदायुद्ध होऊन त्यांत दुर्योधन पडला. दुर्योधन युद्धाचे तेरावे दिवशीं पडला व पांडवापासून निघून गेल्यानंतर ४२ दिवसांनी बलिरामदादा कुरुक्षेत्रीं आले.ऽ अर्थात् बलिरामदादा पुष्य नक्षत्रीं निघून गेल्यानंतर २९ दिवसांनी युद्धाला सुरुवात झाली. युद्धाला आरंभ मार्गशीर्ष वद्य ४ ला झाला असल्यामुळे त्यापूर्वी एकोणतीस दिवसाचे अगोदर येणारें पुष्य नक्षत्र कार्तिक वद्य पंचमीचच असलें पाहिजे.

हल्लीचे महाभारताप्रमाणे भीम आणि दुर्योधन यांचे गदायुद्धाचा दिवस भारतीय युद्धाचा १९ वा दिवस होता असें दिसतें. भारतीय युद्ध अठरा दिवस चाललें होतें व १० वे दिवशीं गदायुद्धांत दुर्योधन पतन पावला अशी सर्व लोकांची जी हल्ली समजूत झालेली आहे तिला कारण महाभारतांतील त्या तऱ्हेचें वर्णनच असलें पाहिजे.

युद्धाचे दिवस तेराच

भारतीय युद्ध संपल्यानंतर कृष्णद्वैपायनाने युद्धाचा इतिहास लिहिण्यास आरंभ करून तीन वर्षांत आपला ग्रंथ लिहून पुरा केला. या ग्रंथाचें नांव 'जय' असें होतें. हा एक पद्यांत लिहिलेला साधा इतिहासग्रंथ होता, काव्यग्रंथ नव्हता. 'इतिहासोत्तमादस्मात् जायन्ते कविबुद्धयः' असें म्हणून व्यासांनी काव्य लिहिण्याचें काम पुढील कवींवर सोपविलें होतें. त्याप्रमाणे पुढे भारत नांवाचा काव्यग्रंथ लिहिण्यांत आला. कालान्तराने निरनिराळीं उपाख्यानें वगैरे आंत घालून तो भारत ग्रंथ

---

* रोहिणेये गते शूरे पुष्येण (शल्य अ. ३५ श्लो. १५) पुष्येण संप्र यातोऽस्मि (शल्य अ. ३४ श्लो. ६)

ऽ चत्वारिंशद्दिनान्यद्य द्वे च मे निःसृतस्य वै (शल्य. अ. ३४ श्लो. ६)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाटविण्यांत आला व त्याला महाभारत हें नांव देण्यांत आलें. भारताचें महाभारत करणाऱ्या मंडळींत कांही जण कटपयादि+ पद्धतीचे अनुयायी असावेत असें वाटतें कारण कटपयादि पद्धतीप्रमाणें 'जय' या शब्दानें १८ या संख्येचा बोध होतो व हलींच महाभारतांत अटरा या संख्येचा जिकडे तिकडे सुकाळ करण्यांत आला आहे. तो अर्थातच या कटपयादि पद्धतीचे अनुयायांनीच केला असला पाहिजे.

महाभारतामध्ये, एकंदर ग्रथाचीं पर्वे १८, गीतेचे अध्याय १८, युद्धाचे दिवस १८ व युद्धांतील सैन्याच्या अक्षौहिणी १८ असें सांगून अटरा या संख्येचें जें प्रस्थ माजविण्यांत आलें तो कटपयादि पद्धतीच्या अनुयायांचा खेळ नसून त्या सर्व संख्या वास्तविकच असतील, असें म्हणणाऱ्याला आम्ही भीष्मपर्वांतील भीष्म युद्धाचें वर्णन जरा चिकित्सक बुद्धीने वाचावयास सांगतों. कारण तें वाचलें म्हणजे चिकित्सक वाचकाला सहज दिसून येतें की युद्धाचे नवव्या दिवसाचें वर्णन व तिसऱ्या दिवसाचें वर्णन यांचा विषय एकच—कृष्णप्रतिज्ञाभंग—हा आहे. प्रतिज्ञाभंग एकदाच होत असतो अर्थात् या दोन अध्यायापैकीं एक मागाहून जोडलेला असला पाहिजे. तिसऱ्या व चवथ्या दिवसाचें युद्धवर्णन व नवव्या आणि दहाव्या दिवसाचें युद्धवर्णन वाचून पाहतां असें वाटल्याशिवाय राहत नाही की भीष्माने तिसरे दिवशी कृष्णाचे प्रतिज्ञेचा भंग केला व चवथे दिवशी भीष्म शरपंजरी पडले. अर्थात् भीष्माचार्यांनी चारच दिवस युद्ध केलें, दहा दिवस युद्ध केलें नाहीं. पुढील सहा दिवसांची युद्धकथा युद्धाचे दिवस अठरा करण्याकरिता मागाहून जोडण्यांत आली. भारतीय युद्ध बाराच दिवस झालें, अठरा दिवस झालें नाही असा वास्तविक प्रकार असतां महाभारत हा ग्रंथ अष्टादशांक निविष्ट करण्याकरिता भीष्माचार्यांचे युद्धदिवस सहांनी वाढवून युद्धाचे दिवस बाराचे अटरा करण्यांत आले. महाभारताचे संशोधक डॉ० बेलवलकर म्हणतात "मूळच्या जय काव्यांत अटराहून कमी दिवसाचें युद्ध व अभ्यास कारणापुरता अगदी त्रोटक गीतोपदेश अशी स्थिति असणें शक्य आहे"× भारतीय युद्ध अटराहून कमी दिवस म्हणजे वर सांगितल्याप्रमाणे बारा दिवस झालें व तेराचे दिवशी श्रवण नक्षत्रावर भीम व दुर्योधन यांचें गदायुद्ध झालें. तेरावे दिवशी श्रवण नक्षत्र होतें. यावरून पहिले दिवशी मघा नक्षत्र होतें हें न सांगताहि कळण्यासारखें आहे तथापि भारतकर्त्याने 'मघाविषयग: सोम: तद्दिनं प्रत्यपद्यत'ऽ म्हणून युद्धाचे पहिले दिवशी मघानक्षत्र होतें असें स्पष्टपणेच सांगून टाकलें आहे.

महाभारतकालीं दिवसांना सोमवार, मंगळवार इत्यादि ग्रहनांवें देण्याची पद्धत नसून दिवसांना नक्षत्रांचीं नांवें देऊन तिथिगणना करण्याची पद्धति होती असें दिसतें. या पद्धतीप्रमाणे भारतीय युद्ध मघानक्षत्री सुरू झालें व श्रवण नक्षत्री

+ १ यापद्धतीची कांहीं माहिती १९४६ सह्याद्रि मासिकाचे पान ६०९ मध्ये प्रसिद्ध झाली आहे.

× १९४५ सह्याद्रि पृ. ३५ ऽ भीष्म, अ. १७ श्लोक २

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपले असें वर्णन महाभारतांत आलेलें आहे. आणि याच पद्धतीला अनुसरून, बलिरामदादा पुष्य नक्षत्री पांडवापासून निघून यात्रेला गेले असें सांगण्यांत आलें आहे.

बलिरामदादा निघून गेले तें पुष्य नक्षत्र कार्तिक वद्य पंचमीस येणारें पुष्य नक्षत्र होतें. बलिरामदादा निघून गेले त्याच दिवशी श्रीकृष्ण पांडवांकडील सैन्याला घेऊन कुरुक्षेत्रीं गेले. एवढ्या मोठ्या सैन्याची सर्व व्यवस्था लावण्यामध्ये जवळ जवळ एक महिना लागला असावा व म्हणून युद्धाचा आरंभ मार्गशीर्ष वद्यांत येणारें मघा नक्षत्रावर झाला असावा. मार्गशीर्ष महिन्यांत मघा नक्षत्र वद्य चतुर्थीला येतें. चार दिवस युद्ध करून भीष्माचार्य पडले त्या दिवशी वद्य सप्तमी असायला पाहिजे. परंतु वद्य ७ चा क्षय असल्यामुळे भीष्माचार्य पडले त्या दिवशी वद्य ८ मी होती असें म्हणणें भाग आहे. भीष्माचार्यांची ही पतनतिथी लोकांच्या स्मरणांत पिढ्यानुपिढ्या चालत आलेली असावी. निदान 'भारत-सावित्री' हा ग्रंथ लिहिला गेला त्यावेळी तरी ती लोकप्रसिद्ध असावी कारण भारतसावित्रीकार म्हणतो:—

'अर्जुनेन हतो भीष्मो मार्गमासेऽसिताष्टमी'

अशा प्रकारचा उल्लेख महाभारतांत नसल्यामुळे भारतसावित्रीकाराने वरील उल्लेख लोकप्रवादाला अनुसरूनच केला असला पाहिजे. यावरून असें दिसतें की भारत सावित्रीकारांनी आपला ग्रंथ जरी मुख्यत्वे महाभारताला अनुसरून लिहिला आहे तथापि जेथे जेथे लोकप्रवाद महाभारतांतील उल्लेखाच्या विरुद्ध दिसले त्या ठिकाणी तो महाभारतकाराला न अनुसरतां लोकप्रवादालाच अनुसरतो. याचें एक ठळक उदाहरण म्हणजे कर्णपुत्र वृषसेनाचे वधाचा दिवस. वृषसेन हा युद्धाचे अकरावे दिवशी मारला गेला, परंतु महाभारतकाराने भीष्मयुद्ध सहा दिवसांनी वाढविल्या-मुळे भीष्मपतनानंतरचे युद्धदिनांक वास्तविक संख्येपेक्षा सहांनी वाढविण्यांत आले आहेत त्यामुळे वृषसेन अकरावे दिवशी मारला गेला. तो महाभारतांत सतरावे दिवशी मारला गेला असें वर्णन आहे. परंतु लोकप्रवाद तो अकरावे दिवशी मारला गेला असा असल्यामुळे भारतसावित्रीकाराने महाभारताला अनुसरून युद्धाचे दहावे दिवशीं भीष्म पतन पावले असें गृहित धरून व त्या दिवशीं लोकप्रवादाला अनुसरून वद्य अष्टमी होती असें मानून अकरावे दिवशी नवमीला वृषसेन मारला गेला असें वर्णन केलें आहे. भारत—सावित्रीकार म्हणतातः—

अर्जुनेन हतो भीष्मो मार्ग मासे ऽ सिताष्टमी ।
नवम्यां वृषसेनस्तु हतो राजा महाबलः ।।

या श्लोकावरून महाभारतांतील वर्णनाशी लोक प्रवादाचा मेळ घालण्याचे बाबतींत भारतसावित्रीकाराची कशी त्रेधा उडाली हें सहज ध्यानांत येतें. कारण भीष्म पतन पावले तो युद्धाचा वास्तविक चवथा दिवस होता. अर्थात् तो दिवस दहावा मानून दुसरे दिवशी म्हणजे वद्य नवमीला वृषसेन मारला गेला हें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भारतसावित्रीकरांचें विधान सपशेल चुकलें आहे. कारण महाभारतकारांनी युद्धाचे सहा दिवस मध्येच वाढविले हें भारतसावित्रीकाराचे लक्ष्यांतच आलें नव्हतें.

भारतीय युद्ध बाराच दिवसांत आटपलें असतां ते अठरा दिवस चाललें होतें असें वर्णन करून भारताचे प्रक्षेपकाने केवळ भारतसावित्रीकारासच नव्हे तर आधुनिक संशोधकालाहि बऱ्याच घोटाळ्यांत पाडलें आहे. कारण भारतांत इतरत्र आलेल्या वचनांवरून मघा नक्षत्रीं युद्धाला सुरवात झाली व श्रवण नक्षत्री युद्धाचा शेवट झाला असें म्हणावें तर सर्व युद्धकथा १३ दिवसांत आटोपली असें निष्पन्न होतें. परंतु महाभारतकार तर युद्ध १८ दिवस चालून १९ वे दिवशी दुर्योधन पडला असें सांगतात. तेव्हा या दोनपैकी कोणतातरी एक वृत्तांत असत्य अतएव त्याज्य ठरविला पाहिजे असें मनांत आणून आधुनिक संशोधकांनी युद्ध अठराच दिवस झालें ही सत्यकथा मानून भारतांत दिलेली युद्धारंभीची व युद्धान्ताचीं नक्षत्रे प्रक्षिप्त ठरविलीं. एका संशोधकाने तर युद्धाला मघा नक्षत्री आरंभ झाला अशा अर्थाचे 'मघा विषयगः सोमः तद्दिनं प्रत्यपद्यत्' हें जें वचन आहे तें इतराप्रमाणे असत्य न मानतां त्याचा अर्थ युद्ध भरणी नक्षत्रावर सुरू झालें असा करून दाखविला आहे. परंतु तसा अर्थ करतेवेळी त्याला केवढा द्राविडी प्राणायाम करावा लागला! आणि तेवढें करूनहि समाधानाला जागा नाहीच! कारण 'मघाविषय—ग' म्हणजे मघा नक्षत्र ज्या वर्गांत पडतें त्या वर्गांतील एखादें नक्षत्र असाहि अर्थ केला तरी त्या वर्गांतील नक्षत्रें भरणी, मघा, पूर्वा, पूर्वाषाढा व पूर्वाभाद्रपदा यापैकी इतर कोणत्याहि नक्षत्रावर युद्धारंभ न होता तो भरणी नक्षत्रावरच झाला असें मानण्यास सबळ पुरावा कांहीच नाही.

सरळ अर्थाने काम भागत असल्यावर उगीच आडरानांत शिरण्याचें कांहीच कारण राहात नाही. 'मघाविषयगः सोमः' इत्यादि वचनाचा स्पष्ट व सरळ अर्थ करून मघा नक्षत्री युद्धाला आरंभ झाला असें मानलें तर युद्धाची सुरवात माघ वद्य चतुर्थीला झाली असें सिद्ध होतें व चवथे दिवशी भीष्माचार्य शरतल्पीं पडले, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवली म्हणजे भारतसावित्रीकाराचे वेळी प्रचलित असलेला, 'भीष्माचार्य मार्गशीर्ष वद्य अष्टमीला पडले' हा लोकप्रवाद, जो त्याने आपले भारतसावित्री ग्रंथांत नमूद करून ठेवला आहे त्याची सत्यता प्रतीत होते.

भीष्म निर्याण

मार्गशीर्ष वद्य अष्टमीला भीष्माचार्य शरतल्पीं पडले व पुढे ५८ दिवसांनी उत्तरायण सुरू झालें. एवढ्या अवधींत दोन तिथींचा क्षय झाल्यामुळे माघ वद्य दशमीला उत्तरायण सुरू झालें, असें मानणें भाग आहे. उत्तरायण सुरू होतांच पांडवादि मंडळी भेटीस आली, त्यांना भीष्माचार्य सांगतात कीः——

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अष्टपंचाशतं रात्र्यः शयानस्याद्य मे गताः ॥२७॥
माघोऽयं समनुप्राप्तः मासः सौम्यो युधिष्ठिर ।
त्रिभागशेषः पक्षोऽयं शुक्लो भवितुमर्हति ॥२८॥
(अनुशा. अ. १६७)

वरील उक्तींत 'त्रिभागशेषः' याचा संबंध मासाकडे लावावा किंवा पक्षाकडे लावावा असा प्रश्न उपस्थित करण्याचें कांहीच कारण नाही. कारण पक्षाला 'शुक्लो भवितुमर्हति' म्हणून जें म्हटलें आहे त्याचें कारण त्या पक्षाचें त्रिभागशेषत्व हें आहे. म्हणून त्रिभागशेष याचा संबंध पक्षाकडे लावला पाहिजे. पक्षत्रिभागशेष आहे म्हणजे त्याचे दहा दिवस झाले व पांचच दिवस राहिले आहेत असा अर्थ होतो व 'शुक्लो भवितुमर्हति' म्हटलें आहे त्यावरून तो कृष्ण-पक्ष असला पाहिजे हें उघड आहे. म्हणजे वरील बोलणें माघ वद्य दशमीला झालें असें निष्पन्न होतें. यावरून भीष्मनिर्याणाचा दिवस माघ वद्य दशमी होय असें मानणें भाग आहे.

वरील विवेचनावरून वाचकांचे लक्ष्यांत आलें असेलच की भारतीय युद्धविषयक घटनांचा काल आमचे मतें खालीलप्रमाणे आहेः—

श्रीकृष्ण शिष्टाईकरिता पांडवांकडून कौरवांकडे आश्विन शु. १४ ला रेवती नक्षत्रावर गेले. आश्विन शु. ८ ला पुष्य नक्षत्रावर शिष्टाई संपली व त्याच दिवशी श्रीकृष्ण पांडवांकडे परत आले. कार्तिक वद्य ५ ला पुष्य नक्षत्रीं बलिराम-दादा पांडवापासून निघून गेले व श्रीकृष्ण पांडवपक्षीय सैन्याला घेऊन कुरुक्षेत्रीं गेले. मार्गशीर्ष वद्य ८ ला भीष्म शरतल्पी पडले. पौष शुद्ध द्वितीयेला श्रवण नक्षत्रावर भीम व दुर्योधन यांचें गदायुद्ध झालें आणि माघ वद्य दशमीला उत्तरायणी भीष्माचार्य स्वर्गवासी झाले.

हृदयशारदेस !

कवयित्री — उषा देशमुख

हृदयशारदे हे देवि,
मंदिरि ये, पूजा घे ॥
भावफुलांची गुंफुनि माला
कंठी घाली ही दनबाला
स्वीकृति त्याची करि देवी ॥
मंदिरि नित ग, वास असावा
सुफलित तव वर मजला द्यावा
कवनें गाइन तुजला मी ॥
विकसित, सुललित, सुभग, सुकोमल
पुष्पें वाहिन तव पदावर
आस हीच मज नित्यनवी ॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह री ख

वामन चोरघडे

☆

"तुझं नांव काय रे ?"

"माहा नांव इसन्या."

"अरे विश्राम म्हणत जा."

हें वाक्य इसन्याने आपल्याशीच दोनतीनदा उच्चारलें. तो आवाज, तो कोमलपणा नीटसा न वठवितां आल्यामुळे तो आपल्याशीच हसला. आपल्या खटाऱ्याला जुंपलेल्या बैलांच्या शेपट्या त्याने पिरगळल्या. त्यांची लांब, उभट शिंगें त्याच्या अठरा वर्षांच्या तरुण मनाला आज फार सुंदर दिसलीं. खटाऱ्याची खडखडहि कंटाळवाणी वाटली नाही. कच्च्या वाटेवरचीं धुळीने भरलेलीं तीं झाडें, टाकळीचीं तीं पांढरी फुलें, चंद्रज्योतींचीं पिवळ्या पिवळ्या फळांनी लदबदलेलीं झाडें, सर्व जणूं पहिला शिरवा प्यालासारखीं टवटवीत दिसूं लागलीं. टाकळीच्या फुलांचा सुगंध त्याने मनमुराद छाती भरून जाईपर्यन्त आंत घेतला आणि आपली गाडी नदीच्या रस्त्याने वळविली.

कासरे धरून करकचलेल्या हाताकडे त्याचें लक्ष गेलें. मुंडाश्यांत बांधलेल्या भाकरीने तो पिवळा झाल्याचेंहि त्याला जाणवलें. त्याचे बाजारू आंगडें मळाने चिकट झाल्याचें त्याला कधी वाटलें नाही तें वाटलें व म्हणून त्याने आपला खटारा बाजाररस्त्याने वळविला. दसरू वाण्याच्या दुकानांत शिरल्याबरोबर तेथील उदबत्त्याचे रंगीबेरंगी पुडे, लाल गंधाच्या बाटल्या आज त्याला घ्याव्याशा वाटल्या. दोन पैशांचा गूळ विकत घेऊन त्याने तिथल्या तिथे खाऊन टाकला. साबणाची पांच पैशाची वडी त्याने विकत घेतली. दसरू वाणी 'आ' वासून त्याच्याकडे पाहात असतांना "भाईच लगनाचे कपडे खकान्यानं गादले गा" असें म्हणून म्हातारीला कांही न सांगण्यासाठी त्याने दशरथ वाण्याची काकुळूत केली. रस्त्यावरची एक नरोटी आपल्या मुंडाश्याने पुसून त्यांत त्याने दोन पैशाचें गोडें तेल घेतलें व तो नदीवर येऊन पोंचला. येतां येतां बैलांच्या शेपट्या पिरगाळीत, त्यांच्या पाठीवर थापा मारीत तो आपल्याशीच हरखून पुटपुटला होता—"नीट उभा राहा. बैलाच्या पाठीवर एक हात ठेव. हालूं नकोस. तुझा छान फोटो निघेल." पुनः त्याला जाणीव होई, की आपला आवाज भसाडा आणि कर्कश

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. भाषाहि अशुद्ध आहे. आपल्याशीच मोठ्याने हसून तो रस्त्याच्या झाडाकडे नव्हाळीने पाहात राही.

नदीवर पोचल्याबरोबर तेलाची नरोटी दगडाच्या आसऱ्याने त्याने सरळ ठेवली. बैलाचे कासरे सोडले. डोक्याचें मुंडासें कंबरेला गुंडाळून अंगावरील सर्व कपडे त्याने भिजविले. एक चिंधी तेलांत बुडवून खटाऱ्याला वंगण दिलें. कपड्यांना साबूची सबंध वडी घासून खलास केली. एक एक कपडा आपटतांना दगडाच्याखालील पिळलेली घाण नदीच्या पाण्यांत पटुकी होऊन वाहायला लागली व त्यामुळे त्याला आणखीच अवसान येऊन तो आपले कपडे जोरजोराने आपटूं लागला. शेवटी कपड्यांतून मळ निघेनासा झाला व त्याने ते पिळून वाळवंटांत सुकत घातले.

त्यानंतर नरोटींतील तेलाने आपल्या अंगाला चांगली मालीश केली. नाकातोंडांत, नखाकानांत तेलाचे थेंब सोडले व उरलेलें तेल डोक्याला माखून टाकलें. कपडे सुकून होई तोंवर त्याने आपला खटारा नदींत नेऊन स्वच्छ धुतला.

बैलांचा पेंडीभर कडबा खाऊन झाला नाही तोंच त्याचे कपडे वाळले. मग त्याने मनसोक्त आंघोळ केली आणि व्यवस्थित रीतीने धोतर, सदरा, मुंडासें अंगावर घातलें. त्याचें त्यालाच स्वच्छ, शुद्ध वाटूं लागलें. तशा अवस्थेतच तो कांही काळ बसून राहिला. चिकण्या सुपारीची लावणी त्याच्या ओंठावर तरळत होती. वाळवंटांतील चापट गोटे घेऊन त्याने वाहत्या नदींत तिरपे फेकले व एक, दोन, तीन, चार अशा त्या गोट्यांनी पाण्यावर छलांगी मारतांच तो मोठ्याने हंसला. मग त्याने बैलांच्या मानेवर आपला हात रगडला आणि अगदी त्यांच्या गालाशी गाल घासला. नदीवर दांडखडें आपटायला आलेल्या चार दोन म्हाताऱ्या व पोरसवदा मुलींकडे त्याने बराच वेळ पाहून घेतलें. व मग त्याला स्वतःलाच आरशांत पाहाण्याची इच्छा झाली. त्याने आपला खटारा जुंपला व बाजारवाट धरली. दसरू वाण्याच्या दुकानांत मळका मोटा आरसा होता. तेथे जाऊन आरशासामोर उभे राहात त्याने एक पैशाच्या बिड्या मागितल्या. दसरू वाणी आज त्याच्या थाटाकडे पाहातच राहिला.

" कुठं पाहुणपना चालला कागा ?"

"नाही बा!"

"मग खुषींत आहेसा! अन् बैल बदलले कां रे ? "

"नाही त'! भले गादले होते. नेऊन डुबवलं लमच्याइले नदींत. दसरूमामा, जरा डब्बी त' दे."

त्याने बिडी पेटवली आणि सवय नसतांहि लागोपाठ चार पांच झुरके घेऊन धूर पिऊन टाकला. जवळच बायजा बुढी पानाची पाटी घेऊन बसली होती. तिच्याजवळ जाऊन—

" काकी आज त' पानं वरच्या खुडनीचे दिसतेत व!"

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"काढुन घन! ही लाडीगोडी काढुन गा!"

"काकी, जरा चंची दे न!"

त्याने एक चांगली पट्टी तोंडांत कढवली. बिडींतलाच तंबाखू काढून चार भरल्या व चव्हाटयाच्या चबुतऱ्यावर उगीच बसून पुन: एक बिडी पेटवली. भाजी घेऊन आलेल्या माळणी, मोळ्या घेऊन आलेल्या गोंडणी, मडकीं घेऊन आलेल्या कुंभारणी या सगळ्या त्याला नव्यानवतीच्या वाटूं लागल्या. उगीच एका लहशा गौंडिणीला त्याने मोळीचा भाव विचारून छेडले आणि तिनेहि त्याच्या पोरसवदा छडछडीला आरोळे दाच्छना लावलेले दांत काढून हसून प्रत्युत्तर दिलें. पुन: त्याने एक बिडी पेटवली आणि ओढतां ओढतां त्याला जोराचा ठसका लागला. त्याबरोबर तो शुद्धीवर आला. ऊन पिंगरला आल्याची त्याला जाणीव झाली व कदाचित् म्हातारा आपल्याला उशीर झाला म्हणून रागावेल या आशंकेने त्याने खटाऱ्याच्या धुऱ्यावर बसून बैलांच्या शेपट्या पिरगाळल्या; त्यांनी वेग धरावा म्हणून चारदोन शिव्या द्यायला तोंड उघडलें. बैलांची आई बहीण त्याच्या तोंडावाटे बाहेर पडतच होती तोंच त्याला काय वाटलें कुणास ठाऊक, त्याने आवरतें घेतलें. आपण रोज विनाकारण बैलांना अचकट विचकट शिव्या देतों याबद्दल त्याला स्वत:चाच राग आला आणि त्या रागांतच त्याने जवळ उरलेली एक बिडी मोडून फेकून दिली.

त्याचा खटारा त्याच्या वडिलोपार्जित खोपटाजवळ येऊन उभा राहिला. खोपटाचें झडप बाहेरून बंद होतें. म्हणजे त्याचा बुढा, बुढी व मागच्या वर्षी पन्नास रुपये देऊन करून आणलेली त्याची बायको सुभी अजून शिवारांतून परत आली नव्हती. त्याने सरळ खटारा वावराकडे हाकलला. शेताच्या पांधणींतून आंब्याच्या सावल्या थंडगार पसरल्या होत्या. त्याने उगीचच शीळ घातली. कुठलेंसें दंडारीतलें एक गाणें एका ललकारीने म्हणून टाकलें. दुसऱ्या पांधणीच्या पलिकडे त्यांच्या शेताची तीन एकराची पट्टी होती. अंदाच्या वर्षी शेताची डाव बुजवून कासकुंदा काढायचें त्याच्या म्हाताऱ्याने ठरविलें होतें व म्हणून महाजनाकडून मागच्याच आठवड्यांत एक टिकास उसनी आणली होती. त्यामुळे त्याची म्हातारी व सुभी स्वत:च्याच शेतांत काम करीत होत्या.

इसऱ्या शेतावर पोंचला तेव्हा म्हातारा घामाने डबडबून जमिनींत टिकास खुपसीतच होता. म्हातारी आणि सुभी उपसलेल्या ढेकळांतून कांस वेंचून काढीत होत्या. इसऱ्याला पाहातांच म्हातारा म्हणाला--

"काय करत होता गा शहरांधी? गांवाचा सौदा का?"

"नाही गा, पंटोलवाल्यानं देर लावली."

"बैल नदीवर नेले होते का?"

"हं!"

"अन् कपडे?"

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तेवढ्यांत सुमीचें त्याच्याकडे लक्ष गेलें. ती त्याच्याकडे डोळे फाडून पाहूं लागली. कपाळावरचा घाम तिने हाताच्या कोपराने निपटला व उगीचच इसन्याकडे पाहून एक मुरका मारल्यामुळे तिच्या नाकांतील मोठी पिवळी गाटल्याची नथ हालत राहिली. इसन्याने सुमीकडे पाहून तिला आपल्याजवळ येण्याची खूण केली. सुमीने सामूणामन्याचें लक्ष नाही असें हेरत त्याला 'नाहीं.' म्हणून इशारा केला. इसन्याने रागाने गाल फुगवून तिच्याकडे पाहिलं व हात उगारण्याची बतावणी केली. सुमी खुषींत आली आणि तिने सामूच्या बाजूला पडलेला टिनाचा पोहरा उचलून पाणी पिण्याच्या मिषाने ती शेजारच्या वाडींतील विहीरीकडे निघाली. तिच्या मागोमाग इसन्याहि गेला.

"हं, काय म्हननं आहे! आज त' नजर नाही टैरत."

"चुप राहूय."

"माय, मघापासूनचं हे दावनंच दावनं कायचं व्हय की!"

"सुमे !"

"काय ?"

"ए सुमे !"

"त' आता बोलसीन् का नुसता हाकारा र देसीन्!"

"सुमे."

"आता काय झालं का जानं की."

त्याने जरा पुढं होऊन तिच्या दोन्ही खांद्यावर हात टेकले. तिने ते आजूबाजूला पाहात लटक्या रोषाने झटकून टाकले.

"आज झालं का गा तुले? असा दिवसाढवळ्या कायचा व्हय लाडप्यार! अन् हे सनेद् लोक का म्हनतीन् मले!"

"सुमे, आजपासून मले इसराम म्हनत जा."

"काहून ?"

"माहा नांव तसंच हाए. इसन्या म्हनलं तर याद राख."

"इसन्या ! इसन्या !"

"चूप राह्य पोट्टे ! एका थापडीचा तं' जीव नाही अन् रिकामी मुजोरी. म्हनते का नाही इसराम ?"

"बरं बाई, इसराम. पन झालं काय ?"

"आव आज गेलतों नाही कां शहरांत ! तिथी काय झालं सांग बरं ?"

"काय झालं ? होटलांत भजे खाल्ले अससीन्."

"हात् पोट्टे ! बोलून चालून हेच बोलशी. आव आज माहा फोटू काढला."

"असं ! कोनं ?"

"चार साहेबा होते. दोनतीन साहेबिनी होत्या. अन् एका साहेबिनीजवळ एक काळा फोटूचा संदुक होता."

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" सायबिन म्हनजे मडुम कां रे ? "

" नाही व. आपल्या सारख्याच बायका होत्या. पर मलमलीचे कपडे नेसल्या होत्या. अन् गोऱ्या गोऱ्या पिकल्या मोहावानी. अन् मारे लाडांत येऊन साहेबाईशी मस्करी करत होत्या. मोराच्या पखावानी लुगडं नेसल्या होत्या."

" पग तुहा फोटो काहून काढाडला ? "

" आवं, मी उभा होतों आंबराईजवळच्या हीरीजवळ. ते साहेब आले अन् त्याहीनं माह्याकडे पाहून साहेबिनीशी गिटपीट यसूर्पेत् केलं. अन् मले एक साहेबिन पुढं होऊन बोलली—"

" कोनाशी ? तुह्यासीन् ? "

" नाही त' का तुह्याशी ! आयकत बी नाही लमची ! "

" बरं, सांग गा माह्या इसरामा."

" त' मग थे साहेबिन म्हगते कसी—ए गाडीवाल्या, तुह नांव काय रे ! म्या सांगलन् इसऱ्या. त' दुसरी म्हणे—अरे, इसराम म्हग. त' मंग साहेब म्हनला—इसराम, तुहा अन् तुह्या बैलाइचा फोटो उतारायचा आहे. तूं बैलाचे कासरे धरून जुवाड्यावर बस. अन् मंग एक साहेबीन बसली धुऱ्यावर. अन् दोन साहेब बसले खगऱ्यांत. अन् एक चाकावर पाय देऊन कलून उभा राह्यला. मी आपला बसलों वा चोरावानी. काय लमचे माहे कपडे ! तुही आन बा. मले सरमल्यावानी झालं. अन् माही नजर गडली जिमिनींत. इतक्यांत ते दुसरी मोठी साहेबिन माह्याजवळ आली अन् तिनं आपल्या हाताइनं मले टीक ठीक बसवलं. असे साजरे होते तिचे हात सुभे. अन् सस्याच्या अंगावानी नरम नरम."

" इसऱ्या, तुले साहेबिननं हात लावून बसवलं ? "

" हो ! "

" अन् तुह्याशी बोलली ? "

" हो ! "

" इसऱ्या ! "

आणि सुभीने इतक्या लोभाने, इतक्या अनुरागाने, इतक्या आपुलकीने इसऱ्याकडे पाहिलें की त्यानें खुदकन् हंसून तिच्या गालांना हात लावला आणि गळ्याशी खोल्याच गुदगुल्या केल्या.

" इसऱ्या तूं खरंच साजरा आहे रे ! "

ती कौतुकानें त्याच्या अगदी जवळ आली.

" अन् आयकशीन त' जरा. त्या साहेबिननं फोटू उतरला अन् माह्याकडे पाहून हासली. अन् म्हणते कशी—इसराम तुहा फोटू छान निघल. निघाल्यावर तुला आम्ही पाठवून देऊं डागींतून. साहेबहि बोलला. अन् मले म्हने—अगल्या सनवारीं डाकखान्यांतून तूं आपलं पत्र घेऊन जा, त्यांत राहील फोटू. अन् दुसऱ्या साहेबानं मले आठ आन्याचे पैसे देले. म्या समद्याइले रामराम केला अन् निघालो."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास:महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" इसऱ्या, ते आठ आने खर्चू नको. "

" आइकशीन्त्री ! "

" बरं सांग, सांग. "

" मले मोठी सरम लागली. म्या दसरू वान्याकडं पैसे मोजून साबन घेतला, तेल घेतलं अन् बैलाइले अन् मीनं त्री खूप साफ आंग धुतलं. त्या पैशांतले दोन आने उरले. "

" इसऱ्या, आन ते पैसे."

इसऱ्याने ते दोन आणे तिच्या हातावर ठेवले. तिने ते उचलून आपल्या पोटच्या बटव्यांत टाकले.

" सुभे, सनवार कई येईन व ! "

" पर्वाच्या त्या रोजीं ! "

" तवा मी जाईन शहरांत. डागवाल्याले दोन आने पैसे दीन अन् माहा फोटोवालं पत्र मागून आनीन. "

" इसऱ्या, मले नेशीन कां रे ! "

" हं. मोठी शायनीच की नाही ! बुढाबुढी कचा खातीन् आपल्या दोघाइले. "

" इसऱ्या असं नाही. तूं सांग काइ बी. लाडाचा त' बोपा हायस् एकला. कस्संहि कर अन् मले घेऊन जा. तुहा फोटू मी पाहीन अन् मंग आपुन एक आरसा घेऊं अन् त्यांत तो फोटू ठेवूं. माह्याजवळ भातक्याचे दहा आने पैसे आहेत. "

" बरं पाहीन ! "

त्यांचा 'परवाचा तो रोज' उजाडला. विश्रामने कसली शक्कल लढविली कुणास ठाऊक, पण तो आणि सुभी निघाले शहराकडे जायला. अगदी सकाळी. जणूं त्यांना स्टेशनवर गाडी पकडायची होती. कावळ्याच्या अगोदर जणूं त्यांना शहर गाठायचें होतें. बैलांच्या बरगडींत रट्टे मारूनहि जेव्हा ते सुभी इसऱ्याच्या मनोवेगाने धावेनात तेव्हा पुन: एकदा इसऱ्याला शिव्या हासडण्याचा मोह झाला पण तो त्याने आवरला आणि सुभीची नथ किटली म्हणून रागावून घेतलें.

शहर आलें. सुभीला सर्वच नवलाचें वाटूं लागलें. इसऱ्याने डाकखान्याकडे खटारा घेतला. समोरच मोठी लाल पेटी खांबाला पक्की केली होती. पोस्टमन खाकी ड्रेसांत इकडे तिकडे फिरत होता. पोस्टमास्तर नाकावर चष्मा ओढून, नसाची चिमूट कोंबीत लिहीत होते. चारदोन माणसें खिडकीशी उभीं राहून कायसेसें बोलत होतीं.

इसऱ्या त्या खिडकीजवळ गेला. त्याने दोन आणे हातीं घेऊन खिडकीमध्ये हात सरकाविला. मास्तरांनी वर पाहिलें.

" काय पाहिजे ! "

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" माहा पत्र ! "

पोस्टमास्तरने दोन आण्याचा एक कोरा लिफाफा त्याच्या हातावर ठेवला.

" अजी हा नाही जी. माहा पत्र, फोटूवालं साहेबिननं पाटवलेलं—"

पोस्टमास्तर त्याच्याकडे चष्म्यावरून पाहातच राहिले.

" कसलं पत्र ? "

" अजी त्या साहेबाईचं. त्याहीनं सांगलन् होतं की सनवारीं तुहं पत्र डाकखान्यांत येईन. "

" नांव काय तुझं ? "

" इसऱ्या. "

" बापाचं नांव ? "

" दमड्ड ! "

" तुझं पत्र नाही. फोटो कशाचा रे ? "

" अजी त्या साहेबानं माहा अन् माह्या खटाऱ्याचा फोटू काहाडला. म्हने आम्ही छापेवाले आहोंत अन् छाप्यांत तुहा फोटू द्यावाचा आहे. अन् मले सनवारी डाकखान्यांत त्याहीनं येवाले सांगलन् "

पोस्टमास्तरांनी कांहीशा करमणुकीच्या पण बऱ्याचशा कीव भरल्या नजरेने त्याच्याकडे पाहिलं—

" नाही रे बाबा. तुझं पत्र नाही. अन् इसऱ्या तूं गधा आहेस झालं ! अरे ते साहेब लोक गेले आपलं काम करून. असे पुष्कळ साहेब इथे येतात गांधीबाबामुळे आणि फोटो काढून आपली खुषी करून घेतात. जा उगीच बैलांना थकवलंस तूं. "

इसऱ्या चिमणीएवढं तोंड करून परतला. सुभीने त्याच्याकडे पाहातांच विचारलं—

" नाही आला फोटू ? "

" नाही. पन आज त' सनवारच आहे ना व सुभे ?

" इसऱ्या, आपन जरा अगदुर आलों. बसूं आपन सांजच्या पाहरेवरी. येईन. साहेबिननं म्हनलं. ते शिकलेसवरले गिटपीटवाले लोक, ते आपल्यासारखे अनाडी नाहीत. तूं पाहून घे–सांजच्या पाहरीं येईन फोटू. चाल त्या हीरीवर भाकर खाऊं आपुन्."

सुभीच्या या सोबतीच्या बोलण्याने इसऱ्याचा चेहरा थोडासा धीरावला. त्याने खटारा आमराईच्या विहिरीकडे वळवला.

त्यानंतर संध्याकाळीं त्यांचा कागद आला की नाही, ते परतले की नाहीत, की पुढच्या शनिवारी आले, की त्यानंतर येतच राहिले, आणि शेवटीं विश्रामला सबंध सावणाची वडी खलास होईपर्यन्त कपडे धुवायला लावणाऱ्या, त्याच्या तोंडच्या शिव्या आवरायला लावणाऱ्या साहेबसाहेबिणींनी काढलेला फोटो सुभीला पाहायला मिळाला की नाही, कुणास ठाऊक ! नागपूर, ३०-३-५०

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझी मित्रमंडळी—

पु. भा. भावे

ना. रा. शेंडे

☆

बारा वर्षांपूर्वीचा ब्रिटिश साम्राज्याचा तो काळ. खरे मंत्रिमंडळाची ती राजवट आणि तें साप्ताहिक 'सावधान'. एकनिष्ठ वाचक होतों मी त्या साप्ताहिकाचा. त्यांत प्रदर्शीत होणाऱ्या मतांसंबंधी नव्हे; तर त्यांतील भाषासौष्ठवा-संबंधी, वर्णनाच्या पल्लेदार शैलीसंबंधी, हृदयाचा ठाव घेऊं पाहणाऱ्या शब्दसृष्टि-संबंधी. आणि एक लेख—हृदय द्रवेल, नेत्र झरूं लागतील असा तो लेख 'विमल तुला काय झालं?' माझ्या वाचनांत आला अन् माझे अश्रुबिंदु त्या लेखावर टपटपा गळूं लागले. मनांत अनेक विचारतरंग उठले. आणि कोण बरं हा शब्दसृष्टीचा परमेश्वर! याचा विचार करीत अश्रूंनी भिजलेला तो लेख मी माझ्या स्मृतिकपाटांत जमा केला.

मला हवा तो सुदिन उजाडला. वाङ्मयावर चर्चा होणाऱ्या एका बैठकीला मी गेलों. एक व्यक्ति—स्थूल पण दणकट अंगाची, गोऱ्या वर्णाची, घाऱ्या तेजस्वी डोळ्याची आपल्या एका विरोधकाला खणखणीत शब्दांत सांगत होती—'असं कचरूं नका. आपली बाजू बेधडक पुढं मांडा. पण माझंच सत्य अन् दुसऱ्याचं असत्य असा दुराग्रह मात्र धरूं नका. अन् याची खात्री असूं द्या की माझ्या शत्रूच्याहि वाणींत वा लेखणींत खरोखरीच सत्य आढळेल तर त्याची पाठ थोपटण्यास मी मुळींच कचरणार नाही···' अशा बुलंद वाणींत वाद घालतांना जेव्हा मी त्या व्यक्तीला पाहिलें तेव्हा तिच्या सरळ पण निग्रही; निर्मळ पण रोखठोक; दिलखुलास पण जोरकस आणि निःसंदिग्ध पण ठासीव बोलांनी माझें मन भारावून गेलें. ह्याच बैठकींत त्या व्यक्तीचा माझा प्रथम परिचय झाला. ही व्यक्ति म्हणजे महाराष्ट्राचें हृदय आपल्या अतुल प्रभावी वाणीनें आणि असामान्य लेखणीनें काबीज करणारे श्री. पुरुषोत्तम भास्कर भावे हे होत.

सद्‌हेतूनें प्रेरित होऊन जी व्यक्ति न्यायासाठीं, माणुसकीसाठी झुंझार-वृत्ति धारण करते आणि स्वतः हाल सहन करून आपलें पाऊल बोमाने पुढेच टाकूं पाहते तिच्या कसोटीला श्री. भावे हे बव्हंशीं उतरत असल्यामुळे माझा त्यांच्या-बद्दलचा अभिमान द्विगुणीत झाला. त्यांच्या परिचयापूर्वी त्यांच्याबद्दल मी अनेक नवलकथा ऐकल्या होत्या. एक बंडखोर जहाल व्यक्ति म्हणून त्यांच्यावरील अनेक आक्षेप मी ऐकले होते. कधी न बधणारा आणि हट्टाने धुंद झालेला बेफाम

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रवृत्तीचा माणूस म्हणून त्यांचें नांव कानावर आदळत होतें. पण हा संपूर्ण ग्रह किती चुकीचा व दोषपूर्ण आहे याचा प्रत्यय मला कांही काळ त्यांच्या सहवासांत राहून आला. भावे बंडखोर आहेत, जहाल आहेत हें खरें आहे; पण ते बंडखोर–जहाल कां ? दु:खितांचें दु:ख पाहून ज्याचें रक्त सळसळतें, कुणावर अन्याय होत असल्याचें पाहून ज्याचे बाहु स्फुरतात, कुणी जबरीने लाथाडले जातें हें पाहून ज्याचें हृदय पेट घेऊन उठतें आणि दीनदुबळ्यांच्या चेंगरल्या जाणाऱ्या जीवांच्या रक्षणार्थ ज्याच्या मुठी आवळल्या जातात तो बेफाम प्रवृत्तीचा जहाल व बंडखोर समजला जावा की वीर वृत्तीचा मर्दगडी समजला जावा ?

भाव्यांच्या जीवनांतील पैलू जग जसें पुढे सरकेल, जसें बदलेल, जसें दृग्गोचर होईल तसे बदलतात, आणि त्यांची घडण अधिक उदात्त होत जाते. वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच भाव्यांची दृष्टि चिकित्सक, शोधक आणि व्यापक होत गेली. कॉलेजांतील त्यांचें जीवन केवळ पदवी प्राप्त करून घेण्यापुरतें मर्यादित झालें नाही. मुळांतच वृत्ति स्वच्छंदी आणि बेडर असल्याने कॉलेजांतील त्यांचा हूडपणा अनेकांना जाणवला. त्यावेळीं त्यांनी केलेल्या उलाढाली, गाजविलेले प्रताप, घातलेल्या धुडघुशींसंबंधी ऐकलें म्हणजे मोठा अचंबा वाटतो. अर्थात् ह्या सर्व गोष्टी करीत असतांना त्यांचें लक्ष अभ्यासाकडे नसे. पण केवळ आपल्या बुद्धिबलावर ते आपली परीक्षा उच्च श्रेणींत पास होत. परिक्षेच्या आदल्या दिवशीं चित्रपट पाहून बेफिकरीने भावे इंग्रजी विषयांत शेंकडा अठ्यांणव गुण मिळवून उच्चांक गांठीत. वर्गांत शेवटल्या बांकावर बसायचें आणि प्राध्यापक विषयांतर करूं लागले की भाव्यांनी बांकावर थापट्या मारणें, शिट्या फुंकणें सुरू केलेंच ! भावे बेशिस्तीचा, उर्मट आणि बंड आहे असें समजून प्रिन्सिपॉलकडे अनेक तक्रारी जात असत. एकदा तर त्यांना परीक्षेलाच बसूं द्यायचें नाही अशी सूचना देण्यांत आली. पण प्रिन्सिपॉल साहेबांचा भाव्यांच्या बुद्धिमत्तेवर विश्वास. त्यांनी ती सूचना धुडकावून लावली. कॉलेजांतील भाव्यांसंबंधीच्या नवलकथा मनोरंजक आहेत.

त्यांचें मराठी भाषेवर जितकें प्रभुत्व आहे तितकेंच इंग्रजी भाषेवर आहे. त्यांची वाणी आणि लेखणी अतिशय प्रखर, तेजस्वी आणि प्रभावी आहे. कॉलेजमध्ये असतांनाच त्यांचें लेखनकार्य आणि वक्तृत्व गाजूं लागलें. भाव्यांच्या इंग्रजी लिखाणापुढे व वक्तृत्वापुढे इंग्रजी प्राध्यापकहि हात टेकीत. वाद-विवाद रंगवावा तो भाव्यांनीच. त्यांचें असामान्य वादपटुत्व ऐकण्यासाठी कॉलेज तरुणतरुणींचा सारखा ताफा जमत असे. आज तर ते आपल्या वैशिष्ट्यपूर्ण वक्तृत्वशैलीने नागरिकांना गुंगवून सोडतात. नौखालींतील अमानुष अत्याचारांचीं दृश्यें पाहून आल्यावर त्यांनी पुण्यामुंबईकडे जीं व्याख्यानें दिलीं तीं इतकीं आवेशपूर्ण व हृदयस्पर्शी होतीं की जनता दिङ्मूढ झाली. जनतेंत नवचैतन्य निर्माण करण्याचें कसब त्यांनी पूर्णपणे साधलें आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. भावे यांनी अखिल महाराष्ट्रावर जबर छाप बसविली ती आपल्या लेखन सामर्थ्याने. पट्टीचा शैलीकार, शब्दशिल्पकार आणि भाषाप्रभु म्हणून त्यांचें नांव दुमदुमत आहे. चिपळूणकर, कोल्हटकर, आगरकर आणि गडकरी यांच्या भाषेचा मनोहर मेळ भाव्यांच्या भाषेंत आढळतो. पण तसें ते स्वयंप्रज्ञ आहेत. त्यांची लेखनशक्ति इतकी दांडगी आहे की एकेका रात्रींतून त्यांनी वीस वीस स्तंभ लिहून काढले आहेत. त्यांच्या लेखणीचा उपयोग करून घेण्यासाठी कांही कांही संपादकांनी त्यांना एका खोलींत कोंडून रात्रीच्या रात्रींतून जाडे जाडे अंक तयार करून घेतले आहेत. त्यांच्या लेखासाठी किंवा लघुकथेसाठी आजहि बरेचसे संपादक त्यांच्या खिशांत आगाऊ रकम कोंबून टेवतात. यावरून त्यांच्या लिखाणाची मातब्बरी सहज कळून येण्यासारखी आहे. यशस्वी पत्रकार, प्रभावी नाटककार व असामान्य लघुकथालेखक म्हणून ते महाराष्ट्राला परिचित आहेत. 'सावधान' साप्ताहिकांतील कामगिरी आटोपल्यावर भाव्यांनी 'आदेश'चें संपादकत्व स्वीकारलें आणि अल्पावधींत तें साप्ताहिक नांवारूपाला आणलें. 'आदेश'मधील त्यांचें लिखाण इतकें तिखट–बोंचक, जळजळित, धारदार व मर्मभेदक असे की विरोधक चारीमुंड्या चीत होत असत. त्यामुळे भाव्यांनी अनेकांचा रोष ओढवून घेतला. पण त्यांना त्याचें कसलेंहि दौर्मनस्य नसे. कांहींनी त्यांची दुर्विदग्ध म्हणून अवहेलना सुरू केली. पण भावे तसूरभहि मागे सरले नाहीत. उलट जिद्दीने, इरेने त्यांनी आपली लेखणी दामटतच नेली. आणि शेवटीं तर एका मजकुरासंबंधी आचार्य प्र. के. अत्रे यांनी 'आदेश'वर फिर्याद केली. पण भाव्यांच्या चतुर सफाईला तोंड देतां आलें नाही म्हणून की काय अत्र्यांना ती फिर्याद सहीसलामत काढून घ्यावी लागली. वृत्तपत्रसृष्टींतील भाव्यांचें जग कांही वेगळेंच !

लघुकथेच्या प्रांगणांत तर त्यांचा हात धरणारा उभ्या महाराष्ट्रांत आज दुसरा लघुकथाकार मला नाही. उत्कृष्ट भाषाविलास, खुमासदार शैली, अर्थपूर्ण आशय आणि चित्तवेधक रचना ह्यांनी सजलेली त्यांची डौलदार कथा वाचकांना भारून टाकते. 'पहिला पाऊस', 'स्वप्न' आणि 'सतरावें वर्ष' हे त्यांचे तीन उच्च श्रेणीचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले असून मराठी भाषिकांना त्यांची अवीट गोडी लागली आहे. भाव्यांनी वाचकांच्या हृदयाची इतकी तीव्र पकड घेतली आहे की त्यांचेवर अढळ श्रद्धा ठेवणारे बहुसंख्य वाचक पाहून मी स्थंभितच होतों !

त्यांच्या प्रत्येक कथेंत जीवनांत प्रत्यही अनुभवास येणाऱ्या घडामोडीचें वस्तुनिष्ठ चित्रण केलेलें असतें. त्यांची कथा म्हणजे मनुष्य प्रकृतीचा स्वच्छ आरसाच आहे. जो ज्या प्रकृतीचा असेल त्याला आपण कसे हें तेथे न्याहाळून पाहतां येईल. व्यथा, सार्थक, पुनर्जन्म, दया, निष्ठा, पहिला पाऊस, हेमांगिनींचें प्रेम, सीमेवर, अखेर, रहस्य, निर्णय, प्रकृति, मादाम पिशी, संगम, संस्कृति, यंत्र, काळ काम वेग, सतरावें वर्ष, माणुसकीच्या मर्यादा, पैज, मुक्ति, ध्यास, फाटलेलें आकाश अशा अनेक उच्च प्रतीच्या कथांचे भावे हे जनक आहेत. कुठे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कष्टाळू, राबणाऱ्या व्यक्तींचीं दु:खें कशीं तीं सांगून त्यांचेबद्दल सहानुभूतीचे पाझर फोडले आहेत; तर कुठे बेगुमानपणे वागणाऱ्या व निष्ठुर असलेल्या व्यक्तींच्या जीवनावर कोरडे उगारले आहेत; कुठे स्त्रियांच्या जीवनाचा कैवार घेतला आहे तर कुठे त्यांच्या स्वैर वर्तनाचा खरपूस समाचार घेतला आहे; कुठे मानवी जीवनाच्या खूप खोलांत शिरून विविध रंगांचें दर्शन घडविलें आहे; तर कुठे दिमाख मिरविणाऱ्या ऐतेखाऊंच्या चिंधड्या उडविल्या आहेत. दीन-दुबळ्यांबद्दल सहानुभूति, श्रीमंतांच्या घमेंडखोर वृत्तिबद्दल चीड, संस्कृतीबद्दल प्रेम, अव्यावहारिक व माणुसकीला सोडून जीवन जगणाऱ्यांबद्दल घृणा, सहृदयता असे नाना प्रकारचे हृदयस्पर्शी प्रवाह त्यांच्या कथांतून वाहात असतात. समाजांतील अशी कोणतीहि व्यक्ति त्यांनी चित्रित केली नाही की जी जीवन वैविध्यांतून गेली नाही. अशा प्रकारे समाजांतील अनेक थरांतील विविध व्यक्तींचीं मार्मिक चित्रें अतिशय कुशलतेने रेखाटून भाव्यांनी फार मोठें वाङ्मयकार्य साधलें आहे.

स्त्रियांबद्दल भावे अनुदार वृत्ति दाखवितात अशी त्यांचेवर कांहींची टीका आहे. पण ही टीका किंवा आक्षेप किती निराधार आहे हें त्यांच्या व्यथा, संगम, माणुसकीच्या मर्यादा, फाटलेलें आकाश, मादाम पिशी ह्या कथांवरून अगदी स्पष्ट होतें. स्त्रियांबद्दल त्यांना किती आदर वाटतो, त्यांचेसाठी प्राणहि पणाला लावण्यासाठी त्यांचा आत्मा कशी धडपड करतो हें त्यांच्या ' रक्त आणि अश्रु ' मधील बंगाल--करपून गेलेलें कुसुम, विमल तुला काय झालं ?, किर्लोस्कर बुवांची बायकोवाली, मुस्लीम स्त्रियांची करुण किंकाळी, जाफर हुसेन प्रकरणाचा निष्कर्ष या लेखांवरून येईल. आपल्या संस्कृतीला सोडून, आपल्या धर्माची अवहेलना करून उद्दाम वर्तन करणारी, दिमाखाने चवचाल वागणारी, स्वैर वृत्तीची स्त्री भाव्यांनाच काय, कोणालाहि आदरणीय वाटणार नाही. स्त्रियांपासून भाव्यांच्या उच्च अपेक्षा आहेत आणि म्हणूनच ते स्त्रियांबद्दलचा आपला विशाल दृष्टिकोन अधिक स्वच्छ, अधिक स्पष्ट शब्दांत सांगतात. ' विष कन्या ' ह्या आपल्या प्रभावी नाटकांत त्यांनी भोगलालसेने आणि धनलालसेने प्रेरित झालेल्या स्त्रियांचा एक नमुना म्हणून 'विषया'चें पात्र रेखाटलें आहे. समाजांत इष्टोत्पत्तीस येणारी वस्तुस्थिति भावे नजरेआड करूं शकत नाहीत. पण ज्या स्त्रिया आपला धर्म जाणून वागत असतांहि जेव्हा त्यांना अनुदारपणे, बेमुर्वत-खोरपणाने वागविण्यांत येतें तेव्हा ते चवताळून पुरुषवर्गावर जोरदार हल्ला करायला मागेपुढे पाहात नाहीत. गडकऱ्यांच्या 'सिंधू'बद्दल त्यांना नितांत आदर वाटतो. कारण समाजांत त्यांना सिंधूसारख्या स्त्रिया पाहिजेत. म्हणूनच जेव्हा जेव्हा 'सिंधू' सारख्या स्त्रियांचा प्रश्न चर्चेला निघतो तेव्हा तेव्हा भावे भान विसरून 'सिंधू'ला उचलून धरतात. मागील वर्षी मुंबईला एका लग्नाचे प्रसंगीं असाच वाद निघाला असतांना एका कोपऱ्यांत बसून भाव्यांनी सतत चारपांच तास गंगाधर गाडगीळ सारख्या प्रभृतींशीं भयंकरच हुज्जत घातली आणि तसेंच दीड वर्षापूर्वी गडकरी स्मृति-दिनानिमित्त दिलेल्या व्याख्यानांत त्यांनी सारें सभागृह

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हादरून सोडलें. स्त्रियांबद्दल भाव्यांना काय वाटतें याचें एकच उदाहरण द्यायचें म्हणजे 'रक्त आणि अश्रु' मधील त्यांची लेखी प्रतिज्ञा लक्षांत घेण्यासारखी आहे—

' स्त्रियांचा मी सदैव आदर करीन. अबलांचें मी सदैव रक्षण करीन, पतिव्रतांच्या पावित्र्यासाठी मी माझे प्राणहि ओवाळून टाकीन. '

भावे प्रतिगामी विचारसरणीचे आहेत असा कांहींचा समज आहे. पण त्यांची विचारधारा एका विशिष्ट चाकोरीपुरती मर्यादित नाही. तर ती व्यापक, प्रगल्भ आणि सुधारणावादी आहे. त्यांचे जसे विचार असतात तशी त्यांची कृतीहि असते. इतरांप्रमाणे बाहेर सुधारणेच्या गप्पा मारायच्या पण आंतून कर्मटपणा राखायचा अशी कोती, आकुंचित दृष्टि भाव्यांची नाही. तत्वज्ञ कवि श्री. शरचंद्र मुक्तिबोध यांचेशी निरनिराळ्या विषयांवर झालेली चर्चा ऐकून भाव्यांच्या पुरोगामी विचारसरणीची आम्हाला केवळ जाणीवच झाली असं नाही तर त्यांनी आयुष्यांत ज्या कांही धाडशी गोष्टी केल्या याचा अनुभवहि आला. त्यांनी वर्णभेदाचा व जातिभेदाचा वेळोवेळीं चांगलाच परामर्श घेतला आहे. समाजांतील खालच्या थराच्या उन्नतिस्तव त्यांचा आत्मा तळमळत असतो. ज्या दलितवर्गाशी आम्ही फटकून वागलों व त्यांची छळणा केली त्या वर्गानें उद्या बदला घेतला तर आम्हाला दुःख वाटण्याचें कांही कारण नाही, असं ते जळजळित शद्वांत बोलून दाखवितात. भावे तसे कट्टर हिंदुत्वनिष्ठ आहेत. त्यांच्या राजकीय विचारासंबंधी आणि कार्यासंबंधी मला कांही म्हणायचें नाही. कारण त्यांचें तें स्वतंत्र क्षेत्र आहे. त्या बाबतींत आमचं तीव्र मतभेद असले तरी भावे व्यक्ति, साहित्यिक आणि कलावंत म्हणून त्यांचें जें व्यक्तित्व आहे तें मात्र इतकें उठावदार व प्रभावी आहे की त्यांच्या सहवासांत येणारी व्यक्ति जिव्हाळ्याच्या संबंधाने तद्रूप होते.

भाव्यांना दिखाऊपणा मुळींच आवडत नाही. एखादी गोष्ट रुचली नाही तर ते कसलीहि भीडमुर्वत न बाळगतां अगदी स्पष्ट शद्वांत काय तें सांगून टाकतात. तोंडपूजेपणाने वागणाऱ्या व्यक्तींना भाव्यांच्या रोकठोक जबाबामुळे ते फटकळ व तुसड्या वृत्तीचे वाटतात. पण भाव्यांना त्याची पर्वा नसते. 'मी लघुकथा कां व कशा लिहितों?' यावर मागील वर्षी नागपूर विद्यालयाच्या 'शारदा मंडळा'च्या हीरकोत्सव प्रसंगीं भाषण देतांना ते प्रांजळपणे म्हणाले, "जें जें मी पाहतों, अनुभवतों तें तें मी माझ्या कथेंत रेखाटतों. त्यावेळीं कसलाहि मुलाहिजा मी बाळगत नाही. मी पितों अन् खूप पितों, सिगारेट ओढतों अन् खूप ओढतों, बोलतों अन् बेधडक बोलतों यावद्दल लोक मला दोष देतात. पण आंत दडून मी कांही हें करीत नाही. कांही लोक आंतून नसतील ते रंगढंग करतात व वरून जनतेला आपण कसे सभ्य आहोंत हें दाखवून दिमाख मिरवितात. अशा ढोंगी लोकांची मला भयंकर चीड येते. मी व्यसनी असलों तर तसा आहे हें सांगण्यास मला लाज ती कां वाटावी? मी जें कांही करतों तें अगदी उघड उघड करतों.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तीच गोष्ट माझ्या लिखाणाची आहे. माझी प्रत्येक कथा साधार असते. भलताच रंगसफेदा लावून ती निर्माण होत नाही. अंत:करण ओतून तिची घडण होते. त्यावेळी मी तिची लांबीरुंदी बघत नाही, तिचें कसेंलहि तंत्र लक्षांत घेत नाही. ती माझ्या कल्पनेप्रमाणे उतरली तरच माझें समाधान होतें. कथेसाठीं मला विशिष्ट 'मूड' लागत नाही, टेबल खुर्चा लागत नाही, सजलेला दिवाणखाना लागत नाही, काळ आणि वेळ नाही आणि कसल्याहि वातावरणाची गरज भासत नाही. ती एका तंद्रींत निर्माण होते. हीच माझ्या कथेची, लेखनाची साधी करामत आहे. सनातन मूल्य हेंच माझें मोठें धन आहे." भावे जेव्हा वाद घालतात किंवा भाषण देतात तेव्हा त्यांचा आवेश पाहण्यासारखा असतो. त्यावेळीं त्यांचा चेहरा लालबुंद होतो, सारे स्नायु तडतडूं लागतात, आणि श्रोतृवर्ग एकचित्त होतो.

सुरवातीला त्यांनी वकिली सुरू केली खरी पण त्यांच्या न्याय्यबुद्धीला ती परवडली नाही. अतिशय चाणाक्ष आणि तैलबुद्धीच्या भाव्यांना एखादी चांगली सरकारी नोकरी खास मिळाली असती. पण कुठं नोकरी पत्करणें त्यांच्या मूळ प्रकृतींतच नाही. एकदा एका बड्या अधिकाऱ्याशी भाव्यांचा मोठा खडाजंगी वाद झाला. तेव्हा भावे उसळून म्हणाले, " गुलामगिरीच्या पिंजऱ्यांत गुरफटून स्वातंत्र्याच्या आणि स्वतंत्र विचारसरणीच्या साहित्याच्या गमजा टोकूं नका. आम्ही रस्त्यांत भीक मागत फिरूं पण आपली बुद्धि कुठं गहाण ठेवणार नाही. सारें जग आम्हाला मोकळें आहे. आम्ही रडूं तरी त्या अश्रुबिंदूंतहि आमचें हृदय तुम्हाला हसतांनाच आढळेल. नोकरीचा अधिकार, पैशाची मातब्बरी मी माझ्या लेखणीच्या टोंकावर खेळवतों. हें माझें सामर्थ्य आहे, वैभव आहे!" केवढा आत्मविश्वास वाटतो भाव्यांना आपल्या लेखणीचा!

निर्भीड, धाडशी आणि खंबीर वृत्तीच्या भाव्यांच्या पोलादी हृदयांत ममत्व, ऋजुता, सरलता यांचे आल्हाददायक प्रवाहहि झुळझुळ वाहात असतात. याची जाणीव त्यांच्या सहवासाशिवाय इतरांना होणें कठिण आहे. एके दिवशीं मी त्यांच्याकडे गेलों. ते नुकतेच जेवणासाठी पाटावर बसले होते. माझ्या मागोमाग आणखी एकदोन स्नेहीहि आले. भाव्यांनी आग्रह करून त्यांना पानावर बसवलें. मी तयार नसल्याचें पाहून ते पाटावरून उठले आणि मला छातीशी लावून त्यांनी आपल्या पानावर मला जेवायला भाग पाडलें. भाव्यांचें व्यक्तित्व सिद्ध करणाऱ्या अशा अनेक मनोज्ञ आठवणी आहेत. भाव्यांचें खरें दर्शन दुरून घडत नाही; जवळूनच त्यांची अस्सल पारख होते आणि मग त्यांना आमरण सोडूं नये इतका जिव्हाळा निर्माण होतो.

प्रवासाचें आणि निसर्गप्रेमाचें भाव्यांना भलतेंच वेड आहे. जिथे जिथे हृदयस्पर्शी घटना घडतील तिथे तिथे भावे जाऊन येतात. त्या दृश्यांचा, त्या अनुभवांचा त्यांच्या लिखाणांत, त्यांच्या वक्तृत्वांत भरपूर उपयोग होतो. कोणत्याहि गोष्टीला त्यांना काळवेळ लागत नाही, कसल्याहि गोष्टीची ते तमा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाळगत नाहीत. दिक्कत म्हणून कांही नाहीच. मलत्याच शिष्टाचाराला ते वावदि देत नाहीत. आपण एक आहोत, असेल ते सर्व मिळून खाऊं, कुणाला देतां येईल तितका आधार देऊन त्याला समानतेने वागवूं इतकी उच्च मनोभूमिका त्यांचे ठायीं वसलेली आहे. माणुसकीवर त्यांचा मोठा कटाक्ष आहे. निरनिराळा अनुभव घेण्यासाठी ते एकटेच रखरखीत उन्हांत भटकतील, मुसळधार पावसांत सारखे हिंडतील, कडक थंडींत चहुंकडे संचार करतील. त्यांच्यावरोबर खूप भटकलेले त्यांचे स्नेही प्रा. वामन चोरघडे त्यांचेसंबंधी मोठां बहारदार वर्णन सांगतात. एकदा भाव्यांना अशीच लहर आली. स्वच्छ चांदणें पडलं होतं. ते म्हणाले "चला गड्यांनो, आज आपण स्मशानघाटावर गप्पा मारूं, चला." आम्ही स्मशानघाटावर गेलों. मग भाव्यांच्या भूताखेतांच्या अद्भुत रम्य कथा काय विचारतां ! भीतीनं कापरें भरेल इतकं खुमासदार वर्णन करून त्यांनी स्मशानघाटावर रात्रीं भेट देण्याचे मर्म काय तें आम्हाला सांगितलें. एक दिडच्या सुमारास आम्ही तेथून उठलों, पण भाव्यांचें समाधान कांही झालेलें दिसलें नाही. ते म्हणाले, 'अशा रम्य रात्रीं घरीं जाण्यास कांही मन होत नाही. चला आता तेलंखेडी तळ्याच्या दर्शनाला चला.' आम्ही म्हणालो, 'अरे बापरे चार मैल जायचं!' 'अहो चला' म्हणून भाव्यांनी रस्ता धरला. आणि आम्ही तेलंखेडीच्या त्या निःस्तब्ध, नितांत रम्य वातावरणांत जाऊन पोंचलों. चंद्र पश्चिमेला कलला होता. जवळच्या बगीच्यांतून सुगंध साऱ्या आसमंतात दरवळत होता. भावे म्हणाले, "पहा, हें आहे आपलें शांतिस्थळ. दिलासा, विसावा मिळतो तो इथे. विचारांची शुद्धि, आत्म्याची स्थिरता, मनाची अविचलता आणि हृदयाची मंगलता सारं सारं कांही इथंच." तळ्याच्या काठीं आम्ही बसलों. धूम्रवलयांनी ढग निर्माण केला आणि त्या ...वर भाव्यांच्या जुन्या, खोल अंतरांत दडलेल्या, हृदयाला हलवून सोडणाऱ्या ...रूं लागल्या. कुठून तरी किर्र किर्र असा कर्णमधुर ध्वनि कानीं पडे. जलाशयांत कुठे तरी चुबक् चुबक् असा आवाज होई. भावे ह्या आल्हादकारक प्रशांत वातावरणानं जवळपास बेहोष होऊन जीवनांतील नानाविध तरंग-लोल उमटवीत होते. आम्ही म्हणालों, "भावे, चलाहो आतां पहाट होत आली." ते थोडा वेळ स्तब्ध राहिले आणि मग हळू पण कातर आवाजांत म्हणाले, "बघा, बघा तो चंद्रास्त बघा. त्याचें आजचें शेवटलें दर्शन त्या शांत, प्रशस्त जलांत पाहा. जीवनाचा निष्कर्ष कसा उमटला आहे तो पाहा. स्वर्ग आणि मृत्यु यांचा तो सांधा बघा. स्वर्ण लोपत चाललें, तेज मावळत चाललें आणि जीवनाचा रंग काळा काळा होत जाऊन मृत्यु भयंकर रूप धारण करीत आहे तें पाहा. हेंच हेंच आपल्या जीवनांतील सार, हाच हाच तो आपल्या जीवनांतील अर्थ !" भाव्यांच्या अंतःकरणांत दडलेले अति सूक्ष्म भाव आणि त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा विशाल दृष्टिकोन ! त्यांच्या सहवासांत असतांना त्यांच्यां-तील गुणविशेषांचे असे कितीतरी हृदयंगम प्रसंग नमूद करतां येतील. मित्र-

परिवारांत असतांना ते इतके एकजीव होतात की भावे 'भावे' राहातच नाहीत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांच्या विशाल अंतःकरणाची पारख, त्यांच्या अफाट बुद्धिमत्तेची मीमांसा, त्यांच्या अतुल कर्तबगारीचा आढावा आणि निर्मळ मतांचा थांग केवळ दोन शब्द बोलून किंवा दोन शब्द लिहून लागण्यासारखा नाही. त्यांचा सहवास लाभणें हा एक योगच आहे आणि सुदैवाने मला तो लाभला. शेवटीं मी एवढेंच म्हणेन की भावे म्हणजे–

चंचल मनाची अचंचल प्रकृति; अर्थपूर्ण विचारांची धारदार प्रवृत्ति; आणि दुर्दम्य उल्हासाची भरदार शक्ति !

शी ळ

श्रीपाद गंगाधर कावळे

☆

कोण येई वाजवीत्
शीळ हृदय मंदिरांत
मूक भाव मंद झोत्
पुष्पलता हासवीत्—
ही उजाड रानराई
मोदभरे गीत गाई
सुकलेल्या मोहरास
आनंदे डोलवीत्—
काळी घनघोर रात
घेउनिया कोण दीप
उजळ करित येई घरा
दीपराग आळवीत्—
भावमधुर मुग्ध फुलें
वाऱ्यावर फेकलीस्
अंतरिचे गूढ भाव
ताऱ्यांशी बोललीस
ना वदली एक शब्द
प्रेमाच्या जिवलगास्—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५०
मे

श्री. गुणवंतराव वाकेकर

मधुकर श्रीधर मंगरूळकर

☆

“ ऐकलंत गोविंदराव! हे आमच्या नागपूरचे टेंबे आहेत—”

डॉ. शहाणे यांनी श्री. गुणवंतराव वाकेकरांची, प्रसिद्ध हार्मोनियमपटु श्री. गोविंदराव टेंबे यांच्याशी ओळख करून दिली. धंतोलीवर डॉ. शहाण्यांच्याकडे गोविंदराव टेंब्यांच्या पेटीवादनाचा कार्यक्रम होता. नागपूरांतील वेचक रसिक वर्ग त्या रात्रीं हजर होता. प्रशस्त दिवाणखान्यांत रेशमी गालिच्याच्या बैठकीवर गोविंदरावांची स्वर-मंजुषा ठेवली होती. त्या हॉलचे कोनेकोपरे श्रोत्यांनी पूर्ण भरले होते. सगळ्यांच्या आधाशी नजरा वाद्यावर खिळल्या होत्या. त्या वाद्याची सजावटच अशी उत्कृष्ट की त्याकडे पाहातांच, त्या हस्तिदंती पट्टयांना स्पर्श करून नाजुक लहरी उत्पन्न करणारी बोटें किती भाग्यवान असतील याची कुणालाहि कल्पना यावी. श्री. शंकरराव नेरकरांबरोबर गुणवंतराव येतांच हरवलेली वस्तु सांपडली अशा आविर्भावांत डॉ. शहाणे पुढे येऊन त्यांचा हात धरून आंत घेऊन गेले व गोविंदरावांची त्यांची ओळख करून देत म्हणाले, “ ऐकलंत गोविंदराव ! हे आमच्या नागपूरचे टेंबे—!”



“—आपली भेट व्हावी अशी इच्छा मी केव्हापासून धरून होतों पण आज अकस्मात योग जुळून आला.—या आपण इकडे बसूं—”

“ नको नको! आपल्यासारख्या अधिकारी व्यक्तींचं व्यासपीठ आहे तें! आपण बसावं तिथं. मी इथं बसतों की मंडळींत—”

“—असं कधीं झालं आहे गुणवंतराव. आम्ही आज आपल्या मुलखांत आलों आहोंत. आपल्याला योग्य मान मिळालाच पाहिजे.—”

गोविंदरावांनी हात धरून त्यांना आपल्या शेजारी बसवून घेतलें. गुणवंतरावांची नजर पेटीकडे लागली आहे असें पाहून ते म्हणाले,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" चांगली आहे पेटी नाही ? आमच्या मुंबईचे भगत मोठे गुणी आहेत. भाता हें त्यांचें वैशिष्ट्य—बघा यांत किती हवा राहते ती. तीन साडेतीन सप्तकाची तान संपवून परत समेवर आले तरी षड्जाचा हुंकार चालूच—"

असें म्हणून आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ गोविंदरावांनी तीनसाडेतीन सप्तकाची तान सहज भिरकावून दिली. थंडगार पाण्याचा वाफारा अंगावर येतांच जशी सुखद संवेदना होते, तशा आनंदोर्मि श्रोत्यांच्या अंगावर क्षणभर उठल्या. गोविंदराव म्हणाले—

" गुणवंतराव ! आजच्या कार्यक्रमाची सुरुवात तुमच्यापासून होऊं द्या—"

" छे छे! मी आपला कार्यक्रम ऐकायला आलों आहे. मी ऐकवीन आपल्याला. पण ही वेळ नव्हे. हें ठिकाण नव्हे. ही सारी मंडळी आपल्या हाताकडे नजर लावून बसली आहेत. त्यांचा रसभंग करूं नका. आपण पाहुणे आहांत आजच्या कार्यक्रमाचे—"

" तसं नव्हे गुणवंतराव, या प्रांतांत मान आहे आपला...नाराणरावांचं गाणं ऐकायला लोक येत असत नाटकाला, पण मान तर सूत्रधारालाच प्रथम मिळत असे ना—"

" पण ते दिसायला ठीक दिसत नाही. मी सहज धंतोलीवर आलों. कळलं आपला कार्यक्रम आहे म्हणून...आलों असाच—अनाहूत कां म्हणेनात—"

"—तसं नाही बरं का गुणवंतराव ! तुमचं नांव ऐकल्यावर तुम्ही असल्याशिवाय कार्यक्रमास सुरुवात करायची नाही असा हट्टच गोविंदराव धरून बसले. तुम्हाला घ्यायला गाडी मघाच गेली आहे शहरांत—"

इतक्यांत दुरून मोटरचा हॉर्न ऐकूं आला. " आली वाटतं गाडी परत—" डॉक्टर म्हणाले. थोड्यांच वेळांत ड्रॉयव्हर आंत आला व म्हणाला —

" वो गुणवंतराव साब बहार गये हैं—! "

सारा हॉल खदखदून हसला. तो बिचारा गोरामोरा झाला. डॉक्टर म्हणाले.—

" या गुणवंतराव ! तुम बिन मोरी कौन खबर ले...व्हा पुढे. तुमचं नांव सार्थ झालं पाहिजे हं—"

समोरच्या पेटीचा मोह पडला होता. डावा हात भात्यावर ठेवला. जरा स्पर्श होतांच अंगगत पांढरी चारने "सा" कायम केला. उजव्या हाताची तर्जनी स्वरावर चिकटली. अंत:करणांतून हुंकार निघावा त्याप्रमाणे हळूच एक स्वर त्या स्वरांत मिसळला. नारायणरावांची साथ करीत असतांना कादरबक्षाने गज टाकून "सा" मिळवावा त्याप्रमाणे. हळूच 'पिया गुणवंताने' पुरीयास सुरुवात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केली. रागदारी जाणणारे व त्या चिजेची ओळख असणारे रसिक ती चीज सुरू होतांच किंचित हंसले. आपले नांव असलेली चीज शोधून काढून, सादर करण्यांत त्यांनी योजकता दाखविली हा त्या स्मिताचा अर्थ! त्या वेळचा पुरीया अप्रतीम रंगला. गोविंदराव टेंबेसारखा रसिक श्रोता समोर असल्यावर आणि डॉक्टर शहाण्यांनी गौरविलेल्या 'नागपूरचे टेंबे' ही पदवी सार्थ व्हायला, ती बैठक रंगली नसती तरच नवल. चीज संपतांच गोविंदराव त्यांच्या पाठीवर प्रेमळपणे हात ठेवून म्हणाले,

"गुणवंतराव! धन्य आहे नागपूरकरांची तुमच्यासारखं रत्न जोपासल्या-बद्दल...मी तुम्हाला भगतांकडून पेटी घेऊन देतों आणि मग नागपूरकरांना बघा म्हणावं हाच बाज कोणत्या थाटांत त्यांच्यापुढे येतो तो... वा. छान..."

त्यानंतर गोविंदरावांनी शुद्ध कल्याण वाजविला. दोन्ही कलावंत एकाच बैठकींत ऐकल्यामुळे गुणवंतरावांच्या कलेचें मूल्यमापन त्या दिवशीं करतां आलें असेल. बाहेरच्यांनी तारीफ केल्याशिवायं स्थानिक कलावंताच्या खऱ्या कलेची किंमत लोकांना कळूं नये हा कलेचा शाप आहे की काय कुणास ठाऊक. आता हेंच पाहा. त्या बैठकींत गोविंदरावांसारख्या कलावंताने जाहीररित्या गुणवंतरावांचा योग्य तो मान करून त्यांचा गौरव केला, तेव्हापासून लोकांत त्यांचेविषयी जास्त आपुलकी निर्माण झाली हें मात्र खरें. न्यायमूर्ति भवानीशंकर नियोगी यांनी आपल्याकडे त्यांचा खास कार्यक्रम करून, त्यांना एक अस्सल बनावटीची 'सरस्वति-वीणा' नजर केली.

श्री. गोविंदरावजी टेंबे यांनी आपल्या संगीत साधनेविषयी खूप लिहून ठेवलें आहे. त्यांना ती कला हस्तगत करायला अतिशय त्रास आणि मेहनत पडली ही गोष्ट खरी. परंतु नागपुरचें वातावरण आणि कोल्हापुरापासून पुण्या-मुंबईचें वातावरण यांत मूळ तत्त्वतःच इतका फरक आहे की तिकडे मिळणाऱ्या शेकडों साधनांच्या योगाने खरी कळकळ असलेल्या माणसाला आपलें ईप्सित साध्य करायला फारसें कठिण जाऊं नये. गणपत भैय्यासारखी गुणी माणसें तिकडे त्यांना ऐकायला मिळालीं, पहायला मिळालीं. नागपूरला तर त्यांचें नांव देखील ठाऊक असणें अत्यंत कठीण! पण अशा परिस्थितींत, संगीताच्या अफाट कलेची र ट फ करण्याइतपत ओळख नसतांना देखील, गायनशाळा काढण्याची आणि ती यशस्वी रित्या चालवून दाखविण्यांत गुणवंतरावांच्या हिंमतीची, दुर्दम्य आशावादाची आणि अभ्यासू वृत्तीची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे.

त्यांचा जन्म पांढुर्णा येथे झाला. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यानंतर पोटा-पाण्याचा व्यवसाय म्हणून त्यांनी बडोद्याला जाऊन शॉर्टहॅंड टायपिंग, बुक की पिंग वगैरे गोष्टींचें शिक्षण घेतलें. पुनश्च पांढुर्णा...मांडवल नाही...दुसरी कला जवळ नाही. नागपूरकडे त्यांचें लक्ष होतें. पण तिथे जायचें कसें? उतरायचें कोठे? काम करायचें?...सारे आ वासून प्रश्न! शेजाऱ्याचें लग्नाचें बिऱ्हाड नागपूरला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जाणार असें कळलें. हेहि आपले वऱ्हाडी बनून नागपूरला आले. लग्न संपलें. पुढे काय...? धरणीची शैय्या आणि आकाशाचें पांघरूण! धरणीशी लोळण नकोशी झाली तर दुकानाच्या मऊ फळ्या होत्याच. पाणी पिऊनहि कधी कधी पोट भरूं शकतें हा नवा अनुभव आला. श्री. बंड नांवाच्या एका दूरच्या नातेवाईकांचा त्यांना शोध लागला. ते फोटोग्राफर होते. महालांत त्यांचा स्टुडिओ होता. बुडत्याला काडीचा आधार मिळाला. 'कर्मवीर बुकडेपो'च्या माडीवरील जागेत एक 'कमर्शियल शार्टहॅण्ड टाईपरायटिंग स्कूल' निघालें. दोनतीन मोडक्या मशिन्स मिळाल्या...पण छे! १९१५ ते २० च्या दरम्यानच्या नागपूरला व्यापार उदीमाचा फारसा ळळा लागला नव्हता म्हणून की काय कोण जाणें, शॉर्ट हॅण्ड स्कूल शॉर्ट ऑफ् हॅंडस् झाल्यामुळे बंद पडलें.

एक दिवस बंड साहेबांचा निरोप आला. "मी जरा बाहेरगावीं जाऊन येतों. दुकानाकडे लक्ष द्यावें..."

आता दुकानाचें सूक्ष्म निरीक्षण करावें यापरता दुसरा इतिहास संशोधकाचा धंदा नव्हता. एका कोपऱ्यांत 'सिंगल रिड'ची एक पेटी पडलेली आढळली. फुंकरीनें धूळ उडाली...जणूं निराशेनें भरलेल्या जीवनावरची धूळ उडवायला तीच पेटीची 'पहिली मुलाखात' कामीं येणार होती. भाता हळूंच दाबून पाहिला गुणवंतरावांनी! भाजलेल्या जागेवर हात लावला म्हणजे एकदम रोग्याने ओरडावें त्याप्रमाणे पांचसहा स्वर केविलवाणे आवाज करून ओरडले. त्यांनी घाबरून एकदम भाता बंद केला. त्यांनी इकडे तिकडे पाहिलें. गोपाळ सखाराम आणि कंपनीचा एक कॅटलॉग पाने फड्फड् करून, जणूं खुणावून त्यांना आपल्याजवळ बोलावीत होता. मायाळूपणे तें पुस्तक उचललें. हार्मोनियम गाईड होतें तें. श्री. बंड भजनें गात असत. त्यांनी आपल्या शौकासाठी गोळा केलेली सामुग्री होती. भराभर पानें उलटलीं...त्यांच्या स्मृतींतील पानें उलटून लहानपणाच्या केळवद येथील एका प्रसंगावर स्थिर झाली....नागपूरच्या एका भजनी मंडळीचा कार्यक्रम होता. पेटीवाला मध्यंतरीं उठून गेला होता. लोहाराच्या भात्यासारखा असलेल्या त्या खोक्याचें त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. त्यांनी हळूच भात्याला हात घातला. तोंच मुख्य भजनी ओरडला,

'काय रे पोरा नीट बसतां येत नाही वाटतं. फोडायचा आहे भाता वाटतं—'

'फोडायला काय झालं? तुमच्या माणसानं वाजविला म्हणजे फुटत नाही वाटतं—?'

'खेड्यांत राहून बरीच अक्कल शिकला आहेस रे! तुझ्या बापाने तरी पाहिली होती कां रे पेटी—?'

'—नाही...पण तुमच्या वडिलांनी जरूर पाहिली असेल—'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अशा रितीने भजनाला रंग चढला होता....नुसता हात लावण्यांत ही सलामी घडली होती...तीच पेटी 'आ'वासून दीनवाणा चेहरा करून शरण आल्यागत दिसत होती. गाईडचीं पानं आणखी फडफडलीं. गुणवंतराव मानावर आले. समोर कोपऱ्यांत एक बोर्ड पडला होता. त्यावर लगेच रंगाचा ब्रश फिरला आणि मनांतील अमूर्त कल्पना साकार होऊं लागली....'सरस्वति गायन वादनालय...' अशा रितीने गायन शाळेचें जातककर्म झालें. समोरचेच सुपसांडे वगैरे मंडळी वर्गांत दाखल करून घेण्यांत आलीं. बोटकराकडून आणखी एक दोन पेट्या क्लासांत भरती झाल्या. वर्ग संपला म्हणजे 'गोपाळ सखाराम' उघडल्या जाई आणि दुसऱ्या दिवशीं शिकवायच्या धड्याची रियाज़ सुरू होई. हार्मोनियमच्या मोहिनीमुळे नवी नवी मंडळी भरती होऊं लागली. एखादा विशेष 'हात चलाख' विद्यार्थी आला तर आपलें ज्ञान कमी पडूं नये म्हणून एकलव्याच्या शिस्तीप्रमाणे मेहनत होऊं लागली. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून शिकविणारा शिक्षक म्हणून विद्यार्थी-वर्गांत ते प्रसिद्ध होऊं लागले. (कारण ते स्वतःच विद्यार्थी होते) कितनांचे बोलावणें आलेंच तर अडीअडचणीला उपयोगी पडावी म्हणून 'द्रौपदीच्या पदराची चिंधी' खिशांत तयार असे. 'आलों असतों हो, पण बोट कापलें बघा आजच' या वाक्यानें बोळवण करतां येई. पण या साऱ्या बनावामागे प्रामाणिक भूमिका होती. कारण असे प्रसंग पुन्हा येऊं नयेत याबद्दल जागरूक राहून ते प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. आपले प्रिय मित्र श्री. बाळासाहेब बक्षी यांची साथ करून करून त्यांनी आपल्या बोटांत चापल्य निर्माण केलें आणि राग-ज्ञानांत भर पडूं लागली. टाईपरायटिंगचें शिक्षण घेतांना बोटांना हालचाल करण्याचें जें वळण मिळालें तें पेटी वादनांत अशा रितीनें उपयोगी येईल असें त्यांच्या स्वप्नींहि आलें नसेल.

तो काळ मराठी रंगभूमीच्या भरभराटीचा होता. गंधर्व कंपनीचा वऱ्हाडांतील दौरा अत्यंत यशस्वी झाल्यामुळे, इतर कंपन्यांच्या नजरा नागपूराकडे वळूं लागल्या होत्या. उत्कृष्ट साथीची चटक तिरखवा आणि कादरबक्ष, दादासाहेब चांदेकर, गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या कलावंतांनी नागपूरकरांना लावली होती. असल्या कलावंताची हजेरी हटकून गुणवंतरावांच्या शाळेंत व्हायची. रात्रभर नाटकें वाजवावीत आणि दुपारीं गायन शाळेंत गुणवंतरावांशी लढत घ्यावी. दुपारीं केव्हाहि जावें तों त्या लहानशा माडींत श्रोत्यांना कधीं वाण नसे. अशा अनेक मैफिली माझ्या स्मरणांत अजूनहि ताज्या आहेत. जवळजवळ सारेच तबलजी...फक्त तिरखवा सोडून—आपापले हात इथे सफा करून गेले आहेत. थम्मनखाँ, अझीमबक्ष, मास्तर दीनानाथांचे बल्ल्या वस्ताद, कामुराव मंगेशकर, सौ. हिराबाई बडोदेकरांच्या साथीला आलेले श्री. बाळुभाई रूकडीकर, दत्ताराम पर्वतकर, बनारसवाले रसिले हाताचे अनोखेलाल, यशवंत कंपनीचे बाबालाल...साऱ्यांनी त्यांची साथ केलेली. यांतील कांही वादक नरम, कांही गरम. पण गुणवंतरावांनी साऱ्यांना एकाच तऱ्हेतीने स्वरावर खेळविलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुणवंतरावांचें तालज्ञान इतकें अचूक आहे याचें कारण इतक्या प्रकारच्या तबला-निवाझांबरोबर त्यांनी मिळलेली तालीम !

गोहरबाई कर्नाटकीबरोबर धुलिया उर्फ धुलजी नांवाचा तबलिया आला होता. सरदार गुजरांकडे त्याची गाजलेली साथ मी ऐकली होती. घोडदौड होऊन गेल्यानंतर हवेंत धूळ तरंगत राहावी त्याप्रमाणे त्याच्या हाताच्या आघाताने निर्माण झालेले सुक्ष्म न् सुक्ष्म बोल हवेंत, एका सुराची आस धरून–जणूं एकमेकांचे हात धरून रंगण धरीत....जणू ती धूळ तरंगत राही...त्याचा धिर किडू बाज अती तयार होता व त्यामुळेच धुलिया हें उपनाम त्याला प्राप्त झालें होतें. असल्या असामान्य तबलियाकडून देखील त्यांनी 'वा' घेतली आहे. लखनौचे सुप्रसिद्ध पखवाजिये सखारामपंत यांचे चिरंजीव सदाशिवराव व नारायणराव इन्दुरकर यांच्या तबलावादनाचा योग नागपूर संगीत कॉन्फरन्समध्ये आला होता. त्यांच्या साथींत देखील, त्या मार्डीत बैठकी रंगल्या आहेत.

ग्वॉलेरच्या ' माधव म्यूझिक कॉलेज ' चे प्रिंसिपल गायनाचार्य राजाभैय्या पूछवाले यांच्या गौरवार्थ त्यांनी खास केलेली बेठक अजूनहि पुष्कळांच्या स्मरणात असेल. खाँ साहेब इनायत खाँसारखा तबलिया साथीला, राजा भैय्यांच्या गुण-गौरवाचा प्रसंग आणि निवडक रसिकवृंद यांच्या- त्रयींत बैठक रंगणार नाही असें कसें होईल ! राजाभैय्यांनी त्याबद्दल त्यांना खुल्या अंतकरणाने प्रशस्तीपत्रक दिलें आहे. अशाच प्रकारची आणखी एक अविस्मरणीय बैठक मला आठवते. १९२५ किंवा २६ साल असावें तें. मनहर बर्वे या बाल कलावंताचें नागपूरला पुष्कळच कौतुक झालं होतें. यच्योंच वडील मोठे हौशी होते. त्यांनी तो योग जमवून आणला. "यमुना जळीं"चे कर्ते म्हणून अलिकडे प्रसिद्ध झालेले श्री. दादा-साहेब चांदेकर त्यावेळीं कंपनीमुळे नागपुरांत होते. या तिघांची एक मिश्र बैठक बर्व्यांनी त्यावेळीं घडविली. एक राग घ्यावा आणि तिघांनी तो आपापल्या मगदुराप्रमाणे रंगवून काढावा. गुणवंतरावांचें वादन ऐकून श्री बर्वे म्हणत, "मनहर! ऐकून ठेव हा बाज. पुन्हा ऐकायला मिळणार नाही––"...१९३८-३९ मध्ये गंधर्व कंपनी नागपूराला आली असतांना नारायणरावांनी आपल्या मुक्कामांत खास कार्यक्रम करविला होता. चोणकर, वालावलकर सौ. हिराबाई बडोदेकर यांच्यासारखी मंडळी त्यावेळीं हजर होती. खाँसाहेब अहमदजान तिरखवाँ साहेबांचे बंधु या मुक्कामांत कंपनींत होते. त्यांना सुरवातीला ठाय लय धरणेंहि कठीण झालं होतें. त्यावेळीं चापेकर, हिराबाई प्रभृति हाताने ताल धरून त्यांना तालदर्शन करवीत होते. गुणवंतरावांची मराठी नाटकांतील पदें अगदी हातखंडा. 'दे हा ऽ ऽ ता शरणांगता...' 'उगीच कां कांता...!' 'वद जाऊं कुणाला शरणा' ' किती किती सांगू तुला...' वगैरे पदांनी ती बैठक रंगली. नारायणराव म्हणजे सुरेलपणाचे मूर्तिमंत प्रतीक. त्या दिवशींच सकाळीं 'चतुर संगीत महाविद्यालया'च्या वार्षिक अधिवेशनप्रसंगीं प्रात्यक्षिक करून दाखविलेल्या मुलींच्या आवाजाविषयी अनुदार उद्गार काढून नारायणरावांनी वातावरण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

थोडें तंग केलें होतें. पण तेच नारायणराव गुणवंतरावांचें वादन ऐकून नागासारखे डोलीत होते. जणूं कधींकाळीं आपल्या नाजुक सुकोमल कंठांतून निघालेल्या त्या रम्य गीतांचे प्रतिध्वनीच साकार होऊन त्यांना त्या रात्रीं ऐकायला मिळत होते.

मी स्वत: गुणवंतरावांच्याबरोबर कित्येक बैठकींत व्हायोलिन वाजवीत असे. गुणवंतरावांच्या वादनाची स्वतंत्र घाटणी आहे. पूर्ण महाराष्ट्रीय असें तिचें स्वरूप साधारणत: सांगतां येईल. मध्यंतरीं भीष्मदेव वेदी व नन्हे कुंवर यांच्यासारख्या पंजाबी ढंगाच्या वादकांनी नागपूरच्या वादन कलेंत थोडें वैचित्र्य उपन्न केलें होतें. परंतु बँडच्या चालीसारखी वाटणारी ती ढब लवकरच नामशेष झाली. त्या वाजांचा गुणवंतरावावर यत्किंतहि परिणाम झाला नाही. साधारणत: हार्मोनियमसारख्या वाद्यांत स्वरस्थानें बंदिस्त असल्यामुळे मींड-काम जवळ जवळ अशक्यच. परंतु उत्तम भाता असलेल्या सुरेल हार्मोनियममधून गुणवंतराव हें मींड-काम कुशलतेने करून दाखवितात. तोडींतला कोमल गांधार किंवा बागेश्रींतला आंदोलित धैवत किंवा शुद्ध कल्याणांतील मींडयुक्त तीव्र मध्यम ते लीलेने वाजवून दाखवितात. षड्ज-पंचम भावांत जर स्वरांचें ट्यूनिंग केलेलें असलें,तर विशेष अडचण न जातां स्वरांच्या जवळ जवळ सर्व छटा दाखवितां येतात असें त्यांना वाटतें. शुद्ध कल्याण, मिया मल्हार, वसंत, कामोद, केदार, श्री, काफी हे त्यांचे आवडते राग आहेत. यमन कल्याणांतील ‘ प्यारे दिन छुवा, लंगरवा ’ ही चीज त्यांची फार आवडती.

सर्वसामान्य लोकांना गुणवंतरावाचे कार्यक्रम फार आवडतात. पं. भातखंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त नागपूरास जो सालाबाद गणेश चतुर्थीस कार्यक्रम होत असतो त्यांत त्यांचा कार्यक्रम सहसा रात्रीं २ किंवा २॥ वाजतां व्हावयचा हें जणूं ठरलेलें. तोपर्यंत लोकांनी वाट पहात थांबायचें हें देखील ठरलेलें आणि गुणवंतराव स्टेजवर येतांच टाळ्यांचा गजर व्हायचा हें देखील ठरलेलेंच. अशा वेळीं लोकांना ख्याल नको असतो. ते आपला हट्ट तडीस नेतात. आणि त्यांच्या लाडिक आग्रहाला बळी पडून ‘ किती किती सांगु तुला ’ हें पद लाडिक अभिनयासह वाजवायला सुरुवात करतात तेव्हा कडाडून टाळ्यांची फैर झडते. स्वत: वाजविण्यांत ते पूर्णपणे रंगून जातात. भाता मारून डावा हात मोकळा झाला म्हणजे त्या हाताची अदा आणि त्यांच्या चेहऱ्यावरचा अभिनय पहाण्यासारखा असतो. तानांची कारवाई सुरू झाली म्हणजे वीजा चमकत असल्यासारखें वाटतें. सारखा लवलवाट, चमचमाट चालू असतो....

गुणवंतरावांना आपल्या नैपुण्याबद्दल अनेक प्रशस्तिपत्रकें व बक्षिसें मिळालीं आहेत. सौ. हिराबाई बडोदेकर, गोविंदराव टेंबे, श्री. मल्लिकार्जुन मन्सुर, राजाभैय्या पूछवाले, प्रि. रातांजनकर, करवीर आणि संकेश्वर मटाचे जगद्गुरु

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शंकराचार्य, इंदुरचे रामभाऊ दाते, हैद्राबादचे पूर्वीचे कमांडर लेफ्टनंट कर्नल फैझंग बहादुर इत्यादिकांनी त्यांचें वादन ऐकून त्यांना प्रशस्तिपत्रकें दिलीं आहेत.

सर्व विषयांची चतुरस्त्र माहिती असणें हा त्यांचा आणखी एक स्वभाव आहे. परवा मी त्यांना सहज भेटायला म्हणून गेलों, तो नुकतीच प्रसिद्ध झालेली Constitution of India ची नवी आवृत्ति वाचतांना मला ते आढळले. राजकारणाच्या अद्यावत् हालचालींपासून त्यांना सर्व माहीत असतें. पूर्वी पेंटिंग्स करणें हाहि त्यांचा आवडता व्यवसाय होता. तबल्याचे अनेक बोल त्यांनी बांधले आहेत. आवड म्हणून मधूनमधून रसिकांच्या आग्रहास्तव खासगी रीतीने गातातहि. कांही वर्षांपूर्वी नानासाहेब जोग सारंगीच्या साथीस आणि के. बळीरामपंत पंडे तबल्यावर अशा थाटांत त्यांचे तीनतास गाणें श्रीमंत देशमुखांकडे झालें होतें. आवाजांत गोडवा नसला तरी गळ्याला फिरत आहे. त्यामुळे गंमत म्हणून कधी-कधी ते गातात.

वाढत्या कलेबरोबर त्यांचा काळ पालटला. आपल्या वादन कलेच्या आज ते शिखरावर आहेत. नभोवाणीसारख्या सरकारी संस्थांतून हार्मोनियमसारख्या वाद्याला सकारण म्हणा किंवा अकारण म्हणा जो मज्जाव करण्यांत आला त्यामुळे रसिक जनता गुणवंतरावासारख्या कलावंताला पारखी झाली आहे. अखिल भारतीय पॉलिसी म्हणून रेडिओंत साथीला पेटीला बंदी करण्यात आली असली तरी या वाद्यांत जर एखाद्याने विशेष नैपुण्य मिळविलें असलें तर त्याला सरसहा बंदी करण्यांत यावी हें स्पृहणीय खासच नाही. विशेषतः मध्यम लहरींच्या मर्यादित केंद्राच्या नभोवाणी केंद्राने पक्षपात करूं नये. त्यांच्यासारख्या कलावंताचा सार्वजनिक रित्या संबंध न येऊं शकल्यामुळे कलेच्या एका क्षेत्राला मोठा अन्याय होत आहे. ले. क. फैजंग बहादूर यांनी गणपत भैय्या यांना स्वतः ऐकलें होतें. त्यांनी गुणवंतरावांना त्यांच्यापेक्षाहि वरच्या पायरीवर नेऊन बसविलें आहे. प्रि. शं. ल. सप्रे, श्रीराम संगीत विद्यालय, दिगंबर जैन परिषद जबलपूर, म्युझिक कॉन्फरन्स, सी. पी. अँड बेरार एज्युकेशन सोसायटी, प्रेसिडेंट म्युनिसिपल कमेटी नागपूर, मद्रासी बालमित्र समाज इत्यादि लहान मोठ्या संस्थांनी त्यांना मानपत्रें देऊन त्यांचा गौरव केला आहे. आज जर ते गोविंदराव टेंब्यांना भेटले आणि त्यांची ओळख करून द्यायची पाळी आली तर असें म्हणावें लागेल—

“ हे मुंबईचे गुणवंतराव आणि हे नागपूरचे—”

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या दृष्टीने शक्ति वाढवा !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ-समीक्षा—

महानुभावांचा आचारधर्म

ह. ना. नेने

'महानुभाव तत्त्वज्ञान' या ग्रंथाच्या पाटोपाट थोड्या अवधींत प्रस्तुत चारशे पानांचा ग्रंथ प्रकाशित करून डॉ. कोलते यांनी पूर्वीची प्रतिज्ञा पूर्ण केली असून, महानुभाव वाङ्मय प्रकाशनांत महत्त्वाची भर टाकली आहे. या ग्रंथ-द्वयाच्या जोडीला, महानुभाव पंथाचे आद्य प्रणेते 'श्री चक्रधरजी' यांच्या चरित्रग्रंथ प्रकाशनाची भर त्वरित पडल्यास, एकप्रकारची पूर्णता या प्रकाशनाला येईल. डॉ. कोलते यांच्याजवळ साधनसामुग्री तयार आहेच, तेव्हा तें कार्य त्यांच्या हातून लवकर घडावें, अशी नम्र सूचना करतों.

मागील ग्रंथाप्रमाणेच प्रस्तुत ग्रंथ परिश्रमपूर्वक तयार केला असून, तो अधिकारवाणीने लिहिलेल्या महाभाष्यांना धरून असल्याचें माझ्या यथामति वाचनावरून मी निःसंशय म्हणूं शकतों. चिकित्सापूर्वक व्यासंग, निराग्रही बुद्धि, सुबोध व सरळ भाषेत आधुनिक पद्धतीने विषयाची मांडणी व विवेचन, व सतत परिश्रम करून, न कंटाळतां, काम हातावेगळें व्यवस्थितपणें करणें, इत्यादि डॉ. कोलत्यांच्या अंगीं असलेल्या पूर्वपरिचित गुणांची प्रतीति याहि ग्रंथावरून वाचकांना येईल. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे 'महानुभाव तत्त्वज्ञान' आणि 'महानुभावांचा आचारधर्म' या दोन्ही ग्रंथांतील निरूपणपद्धति व धोरण एकच स्वरूपाचें आहे.

आधुनिक पद्धतीची विषयाची मांडणी, सुबोधभाषा, विवेचनाची सुलभता, अधिकृत अप्रकाशित ग्रंथांतील महत्त्वाच्या तळटीपा, विस्तृत विषयानुक्रमणिका, विषयस्थळ व व्यक्ति दर्शविणारीं परिशिष्टें, आणि निरूपण सुगम होण्यासाठी, त्या त्या निरूपणभूत विषयाला धरून असलेली श्रीचक्रधर सूत्रें, दृष्टान्त, लीळा-चरित्र व स्मृतिस्थळ यांतील लीळा, तसेंच उद्धवगीता व ज्ञानप्रबोध यासारख्या काव्यांतील अवतरणें, इत्यादि गोष्टींमुळे वाचकांची उत्तम सोय झाल्याने सामान्य वाचकांना हा ग्रंथ रुक्ष वाटणार नाही. अर्थातच महानुभाव 'तत्त्वज्ञान व आचार' यांचें, अधिकृत पोथ्यांच्या आधारें हें यथातथ्य पण आधुनिक स्वरूपांत निरूपण आहे आणि तुलनात्मक विवेचन नंतर पुढे करण्यांत येईल असें आग्रहपूर्वक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डॉ. कोलते यांनी आपल्या ग्रंथनिरूपणाच्या धोरणाचें स्पष्टीकरण केलें आहे हें वाचकांनी लक्षांत ठेवावें; म्हणून त्या गोष्टींची अपेक्षा या ग्रंथांत वाचकांनी करण्याचें कारण नाही.

महानुभाव पंथाविषयी जनतेचे गैरसमज आहेत, ते दूर होण्यास या अधिकृत ग्रंथांचा उपयोग विशेष होईल असें मला वाटतें. वरील ग्रंथ ज्या मूल ग्रंथांच्या आधारें लिहिला आहे त्यांची यादी प्रारंभीं दिली असून, ते महानुभाव पंथांत मान्यता पावलेले ग्रंथ आहेत. तेव्हा महानुभावांच्या आचारांतील नैतिक कल्पनांची माहिती या ग्रंथांत मधूनमधून एकसारखी असल्याने त्या वेळच्या नैतिक बंधनांची, संन्यस्त पुरुष व बायका यांच्या परस्पर आचरणाविषयींची, शास्त्राभ्यास, भिक्षा, श्रम-निवृत्ति ('श्रमणि-वृत्ति' नव्हे), परमेश्वर, भक्ति, मूर्ति-पूजा, मोक्ष इत्यादि अनेक बाबींबद्दल, पूर्वी ऐकीव माहितीवरून कलुषित झालेलीं महानुभावेतर वाचकांचीं मनें निवळण्यास या ग्रंथांत पुष्कळ आधार सांपडेल. या दृष्टीने पूर्वीच्या ग्रंथापेक्षा प्रस्तुत ग्रंथ मला अधिक महत्त्वाचा वाटतो. जुन्या मराठीच्या दृष्टीने यांतील अनेक शब्दांच्या टीपा व स्पष्टीकरणें विशेष उल्लेखनीय वाटतात. (खुंट दावें पा. ५४; सोयरीधायरी पा. ५०; देहधर्म, पा. ८; बोडी-गंगा, पा. १४६; सुडा-खांडोबा, पा. १५४; बहिर्वास, पा. ९५०; कारुवा-खारुवा, पा. १५२; गडि-सीडि १७१-१७४; पुर-पाटणा, पा. १७३-१७४; खांडदेऊळ, पा. १८२-१८३; रसनानियंत्रण महत्त्व, पा. १०७; तोरण-मंडळ, पा. ११६; स्त्रियांचा लज्जाधर्म, पा. १५४-१५५; महाराष्ट्रीं असावें, पा. १६७; सत्यप्रियता व गोड बोलणें, पा. २३९-२४१; काकु, कक्षा, भावार्थ, प्रकरण, पा. २६०; इत्यादि) कंसांत दर्शविलेलीं पानें जरी केवळ वाचलीं, तरी महानुभावांच्या आचरणांतील अनेक बाबींचा पडताळा त्या त्या ठिकाणीं प्रतीत होतो. महानुभाव 'कसाबाच्या करणीला' योग्य समजत होते काय, त्यांचें गोड भाषण सत्याला सोडून होतें की सत्याला धरून होतें, त्यांचा वेष आरंभीं भगवा होता की काळा होता, त्यांचें आचरण कपटीपणाचें व आंतल्या गांठीचें होतें काय, त्यांना शुद्धाचरणाची, निर्मळपणाची कांही कल्पना होती कीं नव्हती, मूर्तिपूजेविषयी त्यांना काय वाटतें, महाराष्ट्राविषयी त्यांना काय वाटत होतें, ते मुसलमान धार्जिणे कितपत होते, त्यांच्या अहिंसाधर्माचें कोणतें स्वरूप होतें, इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें, वरील उल्लेखिलेलीं पानें वाचल्यास, वाचकांना आढळून येतील. 'भिक्षे'संबंधी [पानें १७, १९, २४, १४०, १४५, १८१, १८८, २३६, २८२, ३०२, ३२७, ३२९, ३४७.] विवेचन वाचल्यास, रामदासांचीं भिक्षाविषयक वचनें व श्रीचक्रधर यांचीं वचनें, यांच्यांत किती महत्त्वाचें साम्य आहे, तें वाचकांना पाहून आश्चर्य वाटेल. 'आदर्श महात्मा', 'शास्त्राध्ययन', 'स्मरण व प्रस्तदसेवा' (प्रकरणें ७, ८, ९.) हीं प्रकरणें वाचकांनी अवश्य वाचून पाहावीं अशी माझी त्यांना अगत्याची सूचना आहे. पान ३१८ वरील परमेश्वराची आर्ततापूर्वक केलेली प्रार्थना वाचली

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणजे, परमेश्वराची प्रार्थना भक्तिपूर्वक कोणत्या प्रकारें केली जात असे, याची स्थूल कल्पना वाचक करूं शकतील. या सर्व गोष्टी महाराष्ट्रांत गोदावरीच्या उभय तीरांवरील परिसरांत असणाऱ्या अनेक गांवांत, मराठी भाषेत, बाराव्या तेराव्या शतकापासून मराठी जनतेला सांगितल्या जात असत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तत्वज्ञान व सात्विक आचार यांच्या कल्पना मराठी भाषेच्या द्वारें, अशिक्षित जनतेच्या सर्व प्रकारच्या थरांपर्यंत पोंचल्याने हे लोक मुसलमान धर्माच्या आहारीं गेले नाहीत याची जाणीव आपण ठेवली पाहिजे.

प्रस्तुत ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय 'अस्ती परी' (कसें आचरण असावें, पा. १६ पहा.) या 'सूत्रपाठांतील प्रकरणावर आधारलेला आहे. तें सूत्रवाक्य म्हणजे 'विकार-विकल्पशून्यः स्वभावमात्रैः निरालंबीः देवता स्मरणें: जो जन्म क्षेपीः तयासि परमेश्वर पुनरपि आपुला संबंध देति ' हें होय. या ग्रंथांत आलेल्या निरनिराळया प्रकरणांची आंखणी वरील 'सूत्राच्या' दृष्टीने केलेली आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच. विकारशून्यता, विकल्पशून्यता, स्वभावमात्रा, अटन-विजन, स्मरण व प्रसादसेवा, जन्मक्षेपणें इत्यादि प्रकरणांचीं शीर्षकें याच विधानास पुष्टि देतात. 'आचारस्थळ' 'आचारबंद' या 'भाष्यमहाभाष्या'सारख्या प्रतिपादन करणाऱ्या ग्रंथांतून वरील सूत्रमय शब्दांचा व सिद्धांतांचा आक्षेप परिहारपूर्वक खल केलेला असून त्यांच्या आधाराने डॉ. कोलते यांनी तीं तीं प्रकरणें सजविलीं आहेत. विवेचनाला चटकदारपणा यावा म्हणून, त्या त्या विचाराला पोषक असलेल्या काव्यांतील ओव्या, 'दृष्टांत पाठांतील' दृष्टांत, 'लीळाचरित्रांतील श्रीचक्रधरांच्या जीवनांतील प्रसंग, 'स्मृतिस्थळांत' येणारे श्री नागदेवाचार्य यांच्या चरित्रांतील प्रसंग, इत्यादि अनेक अवतरणांचा सरलार्थ देऊन व उल्लेखांचीं स्थळें देऊन, प्रकरणें नटविलीं आहेत. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथ वाचल्याने महानुभाव वाङ्मयांतील अनेक महत्त्वाचे मौलिक ग्रंथ वाचल्याचें श्रेय वाचकांना लाभेल.

कांही शब्दांचा अर्थ करतांना वाचकांनी काळजी घेतली पाहिजे, नाहीतर वर्तमानकालीन अर्थ मनांत येऊन, अर्थाचा अनर्थ व्हावयाचा. अंतर्याग, आलंबन, इसाळु, उजळणे, ओलेपुरुष, कर्मराहाटी, डिंगरा, नामधारक, पचनपाचन, पुर, प्रसादसेवा, बहिर्याग, भजनक्रिया, भूतभजन, अनुभूति-रति, वासनिक, विषयव्यवस्था, श्रमनिवृत्ति, संलग्न, इत्यादि शब्दांचे ' सामान्य-सूची'वरून अर्थ पाहिल्यास वाचकांना त्या गोष्टीचा अनुभव येईल. सूक्ष्म वाचन करितांना किंवा शंकासमाधान करितांना ही बाजू लक्षांत घेतली पाहिजे.

खरें पाहिलें असतां तत्त्वज्ञान आचरणांत ज्याच्या येईल तोच खरा धर्माने वागणारा ('आचरे तयाचा धर्म') व आचरणाने ' योग्यता ' येते व विचाराने आचरणाला 'दृढता' येते. (' आचारें योग्यतः विचारें दृढता '). तत्त्वज्ञानाचा
१७९ पाठिंबा असला म्हणजे ' विकल्प ' मनांत आला, तरी तो नाहीसा होऊन,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आचरणाला 'ढळ' पोचत नाही. या दृष्टीने 'महानुभाव तत्वज्ञान' आणि 'महानुभावांचा आचारधर्म' हे दोन्ही ग्रंथ परस्परपोषक कसे आहेत हें वाचकांना समजून येईल.

हीं आचारसूत्रें ज्या व्यक्तींना व ज्या प्रसंगीं सांगितलीं गेलीं तो इतिहास अपूर्व आहे. त्या व्यक्तींत बहुतांश माणसें अगदी सामान्यवर्गातील असून, त्यांत कित्येक स्त्रियाहि होत्या. त्या त्या व्यक्ति निरनिराळ्या दर्जाच्या व वर्णाच्या होत्या. श्रीचक्रधरचरित्र प्रकाशित केल्याने हा इतिहास बाहेर येईल, व समाजाला कशाची 'भूक' लागली होती याची कल्पना येईल. त्या त्या प्रसंगांतील श्री-चक्रधरांचीं महत्वाचीं वचनें निवडून, त्यांना एका विशिष्ट माळेत गोंवून ज्यांनी 'महानुभावां'साठी, श्री नागदेवाचार्यांच्या नजरेखाली 'शास्त्रान्वय' लाविला व तो 'लौकिक मराठी बोलींत' लावला, त्या 'केशिराजव्यास' पंडितासारख्यांना, 'महापंडित', 'भाष्यकार' अशा संज्ञा कशा सार्थ आहेत, याचें मर्म वाचकांना कळूं लागेल.

वरील कारणांसाठी डॉ. कोलते यांनी 'श्रीचक्रधरचरित्र' अशाच चिकाटीने लवकर प्रसिद्ध करावें व वरील दोन्ही ग्रंथांना पूर्णता आणावी हें पुन्हा एकवार सुचवून, त्यांच्या निरलस वाङ्मयसेवेविषयी धन्यवाद देऊन हें समीक्षण संपवितों.

'महानुभावांचा आचारधर्म', लेखक—डॉ. वि. भि. कोलते, नागपूर; प्रकाशकः अरुण प्रकाशन, मलकापूर, वऱ्हाड; मूल्य ६ रु.; पृष्ठ संख्या सुमारे ४००.

卐

'युगवाणी'ची छपाई

'युगवाणी'ची छपाई आकर्षक व नीटनेटकी होत असल्याचें विदर्भ साहित्य संघाच्या कित्येक सभासदांनी लिहून कळविलें आहे.

मराठीच काय, पण इंग्रजी, हिंदी भाषेंतील आकर्षक व निरनिराळ्या डिझाईनची सुबक छपाई आमच्या मुद्रणालयांत होत असते.

वेळेवर काम, सुंदर ग्रंथमुद्रण, उत्कृष्ठ बांधणी हीं आमचीं वैशिष्ट्यें आहेत.

हरिहरेश्वर मुद्रणालय, महाल चौक, नागपूर शहर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाणी विलास

वि ला सी

★

राजकवि यशवंतांचें अभिनंदन

ता. ११ ते १४ मेपर्यंत मुंबई येथे भरणाऱ्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदीं राजकवि यशवंत यांची निवड झालेली आहे. त्यांना मिळालेल्या या बहुमानाबद्दल आम्ही त्यांचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदीं आतापर्यंत फारच थोड्या ललित लेखकांची योजना झाली आणि त्यांतहि कवि तर अगदीच विरळा. ही परिस्थिति आतापर्यंत अनेकांनी निर्देशलेली आहे. पण याहून महत्त्वाची गोष्ट अशी की आधुनिक मराठी कवींपैकी ज्यांना आपल्या हयातींत असीम लोकप्रियता मिळाली असे आमच्या मतें फक्त दोनच कवि. एक गोविंदाग्रज आणि दुसरे यशवंत. पैकी गोविंदाग्रजांना लोकप्रियता भरपूर मिळाली असली तरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचें मानाचें पान त्यांच्या वांट्याला आलें नाहीं. तो लाभ कवि यशवंतांना झाला हें या वेळचें एक वैशिष्ट्य होय. मराठी साहित्यांत अलीकडे 'नव काव्या'संबंधीने अनेक वाद सुरू झाले आहेत. त्यांत कवि यशवंतहि हिरीरीने भाग घेऊं लागले आहेत हें त्यांच्या अलीकडील कांही भाषणांवरून दिसतें. केवळ या वादांत रंगून न जातां महाराष्ट्र व मराठी भाषा यांच्या सद्यःकालीन परिस्थितीकडे आपली भेदक नजर वळवून आणि भवितव्यतेचा नीट अंदाज घेऊन आजच्या कर्तव्य-कर्मांच्या बाबतींत यशवंतराव सर्वांना योग्य मार्गदर्शन करतील अशी अपेक्षा आहे.

महाराष्ट्र मुद्रण परिषद

नागपूर येथे महाराष्ट्र मुद्रण परिषदेचें दुसरें अधिवेशन प्रसिद्ध भाषापंडित व कोशकार श्री. यशवंतराव दाते यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेंच पार पडलें. 'मुद्रण' कलेपेक्षां 'मुद्रण' व्यवसायाचीच त्यांत अधिक चर्चा झाली असें प्रसिद्ध झालेल्या प्रतिवृत्तावरून वाटतें. या संमेलनाचें फळ म्हणून मुद्रण कलेंत जर कांही नवीन सुधारणा झाली तरच आमच्या मतें परिषद यशस्वी झाली असें म्हणतां येईल. या दृष्टीने कांही कार्य सुरू झालें आहे असें कळतें. आम्ही त्याला सुयश चिंतितों.

वर्ड्स्वर्थ याचा शतसांवत्सरिक उत्सव

प्रसिद्ध आंग्लकवि वर्ड्स्वर्थ याची शतसांवत्सरिक पुण्यतिथि सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरी करण्यांत आली. या प्रसंगाच्या निमित्ताने आम्हीहि आमची श्रद्धांजलि कविवर्य वर्ड्स्वर्थच्या स्मृतिसमाधीवर अर्पण करतों. वर्ड्स्वर्थच्या काव्याची आधुनिक मराठी कवितेवर फार गडद छाया पडलेली आहे या गोष्टीचें या प्रसंगीं विस्मरण होणें अशक्य आहे. वर्ड्स्वर्थचें निसर्ग प्रेम, निसर्गांतील 'साध्याहि विषयांत' मोठा आशय शोधण्याची त्याची वृत्ति, या संबंधीच्या त्याच्या कांही निष्ठा आमच्या कवींनी आत्मसात करूनच आपली उज्वल काव्यसंपदा निर्माण केली. या दृष्टीने मराठी कविता ही वर्ड्स्वर्थची विशेष ऋणी आहे असें म्हणणें चुकीचें होणार नाही. वर्ड्स्वर्थ हा एक श्रेष्ठ निसर्ग कवि होता यांत शंकाच नाही. त्याच्या कांही कवितांनी तर सर्व जगाला वेड लावलें आहे. तेव्हा त्याबद्दल त्याचें कृतज्ञतापूर्वक स्मरण करणें हें सर्व व्यक्तींचें कर्तव्यकर्म होय.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'वाणीचीं खास सदरें'— २

साहित्य वार्ता

★

[प्रस्तुत पत्र सुमारें २५ वर्षांपूर्वी कै. यादव माधव काळे, वऱ्हाडचे सुप्रसिद्ध साहित्यिक व इतिहासकार यांनी डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांना पाठविलें होतें. त्यावेळीं विदर्भांत वाङ्मयेतिहास संशोधनास वाहिलेलें एक मासिक पत्र काढावें यासंबंधीं विचार सुरू होता. परंतु पुढे ती कल्पना मूर्तस्वरूपाला येऊ शकली नाही. तथापि विदर्भाच्या आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या साहित्याच्या इतिहासांत या घटनेला ऐतिहासिक महत्त्व आहे. विशेषतः अशा प्रकारच्या या कल्पनेला इतिहासाचार्य कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचें प्रोत्साहन मिळालें होतें आणि त्यांनी लेखनसाहित्यहि पुरविण्याचें कबूल केलें होतें. या संबंधाने यथार्थ कल्पना साहित्यिक वाचकांना यावी म्हणून सबंध पत्राच पुढे उद्धृत करीत आहोत.

—संपादक 'युगवाणी']

श्री मु. बुलडाणे

ता. २४।९।२४

सा. नमस्कार वि. वि. आपले पत्र पावले. तुमच्या व माझ्या जबाबदारीवर आपण मासिक चालविण्यास हरकत नाही. इतर २।४ गृहस्थास पत्रे लिहिली होती पण कोणी नांव घालण्यास तयार नाही. तूर्त ६० पानाचे मासिक काढावे असे राजवाडे व माझे मत आहे—ते अद्याप येथेच आहेत. आम्ही मेहेकर, ब्रम्हपुरी, देऊळगावराजा वगैरे ठिकाणी पाहून काही जुने ग्रंथ, पद्दें वगैरे मिळविली. शिवाय तुमचा व आमचा ऐतिहासिक पत्रांचा संग्रह २।४ शिलालेख इकडे आहेत त्याची चित्रे घ्यावयाची आहेत. मिळुन ६ महिन्यांना संग्रह आपलेजवळ जमेल. तोपर्यंत पुढील सहा महिन्याचा तयार करता येईल. राजवाडे यांनी वाटेल तितका मजकूर देण्याचे कबूल केलें आहे पण आपले प्रांतांतील आपण प्रथम घेतला पाहिजे. मी दोनदां नागपुरास जाऊन आलो व एक तरी ऐतिहासिक दफ्तर हाती मिळविले तर फार काम होईल. तेथे एक कोणी सहकारी मनुष्य पाहिजे तो मिळविण्याबद्दल पाहीन. या कामाकरिता एक ४०।५० रु. पगारावर चांगला शिकलेला मनुष्य हाताशी पाहिजे. कारण आपण धंद्याचे लोक सर्व वेळ घालविता येणार नाहीं. तरी असा कोणी बहुश्रुत मनुष्य लक्षात असल्यास कळवावा पृथ्वीगीर पापासो हे ६० पानांचे मासिक छापण्यास २।३ महिन्याचे आंत तयारी करू शकतील काय ते कळवावे. उमरावतीस अगर नागपुरास जाण्यापेक्षा तेथे तुमचे व पापासोचे देखरेखीखाली होईल तर फारच बरें होईल. एक wire stitching machine मात्र लागेल. टाईप नवीन पाहिजे. आपले पत्र आले म्हणजे जाहीर करूं. कळावें लोभ असावा ही विनंती.

शशिसेना काव्य एक महिन्यांत छापखान्यास पाठविण्यालायक तयार होईल.

यादव माधव काळे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेश संशोधन वार्ता

मराठी भाषा, विदर्भ वाङ्मय, महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृति इत्यादि क्षेत्रांत संशोधन करणाऱ्या संस्था विदर्भांत निर्माण झालेल्या आहेत. शारदाश्रम, यवतमाळ; मध्यप्रांत संशोधन मंडळ, नागपूर; मध्यप्रदेश रीजनल रेकॉर्डस् सर्वे कमिटी; युनिवर्सिटी हिस्ट्री सोसायटी इत्यादि संस्था उल्लेखनीय आहेत. त्याचप्रमाणे या संस्थांचे घटक म्हणून आणि वैयक्तिकपणेंहि या क्षेत्रांत संशोधन–कार्य करीत असलेल्या अनेक विद्वान व्यक्ति या दिशेने प्रयत्न करीत आहेत. डॉ. य. खु. देशपांडे, म. म. वा. वि. मिराशी, श्री. शं. गो. चट्टे, पं. प्रयागदत्त शुक्ल, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, प्रि. ह. ना. नेने, डॉ. एच्. एन्. सिन्हा, डॉ. करंदेलकर, श्री. दे. गो. लांडगे, श्री. द. वा. महाजन इत्यादि अभ्यासकांचे सतत प्रयत्न चालू आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्रीय जनतेचें आणि आपल्या सरकारचेंहि लक्ष या विषयाकडे वेधलें आहे. हिंदुस्थान सरकारने स्थापन केलेलें 'इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशन्' आणि 'भारतीय इतिहास परिषद' (इंडियन हिस्ट्री काँग्रेस) यांचींहि चालू वर्षाचीं अधिवेशनें नागपूर विद्यापीठाच्या निमंत्रणावरून येत्या डिसेंबरमध्ये नागपूर येथे भरविण्यांत यावयाचीं आहेत. व त्याची पूर्वतयारी म्हणून विद्यापीठाच्या कुलगुरूंनी या विषयाची आवड असणाऱ्या विद्वानांची एक खास सभा बोलावून स्वागत समितीहि स्थापन केली आहे. तेव्हा आपल्या प्रांतांत संशोधनाच्या कार्याला बरीच चालना मिळण्याचा योग आहे.

संशोधनाच्या या निरनिराळ्या शाखांतून झालेल्या संशोधनाचें फलस्वरूप म्हणून काय माहिती प्रकाशांत आली आणि आपल्या ज्ञानांत काय विशेष भर पडली त्याची टिपणवजा नोंद, शक्यतोंवर या विषयावर ज्यांनी परिश्रम केले अशाच विद्वान संशोधकांच्या लेखणींतून अधिकृतपणे उतरलेली अशी, या सदरामधून 'युगवाणी 'च्या वाचकांस वाचावयास मिळेल, अशी योजना आखली आहे.

विदर्भ हा महाराष्ट्राचा आद्य घटक असल्यामुळे ही प्रकाशांत आलेली माहिती अखिल महाराष्ट्रास उपकारक होईल असा विश्वास आहे.

मध्यप्रांत इतिहास संशोधन मंडळ, नागपूर.

नवें कार्यकारी मंडळ

अध्यक्ष—सर भवानीशंकर नियोगी.

उपाध्यक्ष – डॉ. दप्तरी, श्री. पांढरीपांडे, डॉ. शिंगणापुरकर.

कार्याध्यक्ष—प्राचार्य वा. वि. मिराशी.

कार्यवाह—दे. गो. लांडगे.

सहकार्यवाह—श्री. ब. रा. खर्डेनवीस, श्री. श्री. मा. कुळकर्णी.

सभासद—श्री. श. बा. रानडे, श्री. श. ना. कुळकर्णी, श्री. वाईकर, श्री. ल. रा. कुळकर्णी, प्रा. चतुर्वेदी.

—संस्थेच्या कार्यवाहांकडून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ वार्ता—

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा नागपूर मुक्कामीं रविवार दिनांक १६ एप्रिल १९५० रोजी दुपारीं ४ वाजतां भरून तींत खालील महत्त्वाचे निर्णय करण्यांत आले—

(१) तात्पुरती योजना म्हणून असें ठरलें की सरचिटणिसांच्या कचेरीचें सर्व काम श्री. रा. पु. सगदेव, (चिटणीस, नागपूर) यांच्यावर सोपविण्यांत यावें. सरचिटणीस, त्यांच्याकडे येणारा संघाचा सर्व पत्रव्यवहार श्री. सगदेव, नागपूर यांच्याकडे पाठवितील आणि श्री. सगदेव कचेरीच्या कामाची माहिती सरचिटणीसांना वेळोवेळीं देत राहतील. जाहीर निवेदनें सरचिटणीसांच्या नांवाने होतील.

(२) घटनेचा कच्चा मसुदा 'युगवाणी'च्या जुलैच्या अंकांत प्रसिद्ध व्हावा. ता. २५ जुलै १९५० पर्यंत यावर मतें मागविण्यांत यावी आणि ता. १ ऑगस्ट १९५० च्या आंत अध्यक्षांना घटना समितीचें संपूर्ण प्रतिवृत्त सादर करण्यांत यावें.

(३) श्री. बाळासाहेब ढवळे, नागपूर यांनी कोषाध्यक्षाचा चार्ज घेतला.

(४) नागपूर नाट्यमंडळ या संस्थेला संलग्न संस्था केल्याबद्दल मान्यता देण्यांत आली.

(५) गडकरी स्मारक समितीच्या पत्राप्रमाणे व्यवहार पूर्ण करावा.

एप्रिल अखेर सभासदांची संख्या ५०८ (तहहयात सभासद धरून) झाली आहे. मार्च अखेर ४०६ सभासद होते. अर्थात् या महिन्यांत १०२ सभासद नोंदले गेले. यांपैकीं ३५ सभासद भंडारा येथील असून ते श्री. ना. ल. पोतदार यांनी एकट्यांनी नोंदले आहे, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय वाटते. वि. सा. संघातर्फे मी त्यांचे विशेष अभिनंदन करतें. श्री. पोतदारांच्यासारखे उत्साही कार्यकर्ते संघाला मिळाले तर त्याचा उत्कर्ष लौकर होईल यांत शंका नाही.

नागपूर,
ता. २०-४-१९५०

श. दिवाणजी
सरचिटणीस, वि. सा. संघ.

माहे जानेवारी १९५० मध्ये झालेल्या परीक्षांचा अहवाल

वि. सा. संघातर्फे घेण्यांत आलेल्या जानेवारीच्या परीक्षांना एकूण १८ केंद्रांतून २९५ विद्यार्थी बसले. त्यांपैकीं १८७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. खाली दिलेल्या केंद्राच्या नांवापुढे केंद्राधिकारी व त्यांचे सहकारी यांची नांवें दिलीं आहेत. परीक्षा समिति वि. सा. संघातर्फे त्यांची आभारी आहे. उत्तरोत्तर परीक्षार्थींची वाढ होत जाऊन संघाने चालविलेल्या या कामांत सर्वांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुढील परीक्षा ऑगस्ट १९५० च्या ५, ६ व ७ तारखांना होतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५ जुलै १९५० ही आहे. त्या त्या ठिकाणच्या उमेदवारांनी तेथील केंद्रव्यवस्थापकांच्या तर्फेच आपले अर्ज पाठविणे सोयीचें होईल. कोणत्याहि एका परीक्षेसाठी कमीत कमी दहा विद्यार्थी असल्यास त्या ठिकाणीं स्वतंत्र केन्द्र देण्यांत येईल. माहितीसाठी सर्व पत्रव्यवहार 'कार्यवाह, परीक्षा-समिति, वि. सा. संघ; प्रभानिवास, जेलरोड, नागपूर नं. १' या पत्त्यावर करावा.

(१) नागपूर–प्रा. अ. ना. देशपांडे; प्रा. पां. कृ. सावळापूरकर व श्री. माणिकराव वैतुळे.

(२) अमरावती सौ भानुमती सिंह, मुख्याध्यापिका, मुलींचें सरकारी जुनें नॉर्मल स्कूल.

(३) अकोला—श्री. प्र. ना. खोडे; श्री. खांबोरकर, मुख्याध्यापक, श्री. दीक्षित व श्री. देशपांडे (अध्यापक).

(४) आर्वी—श्री. ह. ध. सगणे, मुख्याध्यापक, मॉडेल हायस्कूल.

(५) आकोट—श्री. के. आ. देशमुख, शिक्षक, श्री शिवाजी हायस्कूल, श्री. भा. ब. भेडे.

(६) बुलढाणा—श्री. द. ह. अग्निहोत्री, मुख्याध्यापक सरकारी नॉर्मल स्कूल.

(७) नांदुरा—श्री. म. के. राजूरकर.

(८) हिंगणघाट--श्री. रा. वि. करपे, रॉबर्टसन् हायस्कूल.

(९) वर्धा —श्री. ब. पं. तांदळे, रामनगर.

(१०) वरूड—श्री. व्यं. ग टाकोडे.

(११) एलिचपूर—रा. श्री. शां. गुप्ते, मुख्याध्यापक, कन्याशाळा.

(१२) यवतमाळ —श्री. शं. य. मेलग, अवधूतवाडी.

(१३) दारव्हा—श्री. कृ. आ. पाठक, एडेड हायस्कूल.

(१४) भंडारा—श्री. ज. रा. गोडबोले, मुख्याध्यापक; श्रीमती पुरोहित, श्रीमती कुमुदेव, श्री. ना. ल. पोतदार व श्री. ना. वि. जोशी.

(१५) गोंदिया—श्री. ना. ग. डबीर, वकील, सिव्हिल लाइन्स.

(१७) सागर—प्रा. दा. ल अडोणी, सागर विद्यापीठ.

(१८) जबलपूर—श्री. द. कृ. पाठक, ओंकाश्रम, गोलबाजार.

खालील सद्गृहस्थांनी परीक्षक म्हणून काम केलें त्याबद्दलहि परीक्षा समिति वि. सा. संघातर्फे आभारी आहे--

श्री. व्ही. एल्. ब्रोडस, प्रा. भि. गो. देशपांडे, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. श्री म. माटे, प्राचार्य ह. ना. नेने, प्रा. द. के. केळकर, श्री. रा. पु. सगदेव, डॉ य. खु. देशपांडे, डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. अनंत काणेकर, डॉ. एम्. ए. करंदीकर, व डॉ. मा. गो. देशमुख.

प्रभानिवास, जेलरोड,
नागपूर नं. १.

ता. २१-४-५०.

रा. पु. सगदेव,
कार्यवाह,

वि. भि. कोलते,
संचालक
परीक्षा-समिति, वि. सा. संघ.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

★

ल अंकांत—

ां. इंदुमती शेवडे
तारा पोतदार
ोपाद फडके
ा. रा. दोडके
ना. काटकर
ारी
भाटले
ाहेरील
देशमुख
ाशिवाय
लुब्धाच्या स्मृतिलहरी
ंकपरिचय व
ााणीचीं नित्य सदरें

★

ान–प्रकाश– कल्याण

☆

सद्‌गुणाचा विकास समाजांत व्हावा, सत्यस्वरूप परमात्म्याचा महिमा समाजांत वाढावा, याची ज्ञानेश्वरांस तळमळ होती. मराठी भाषा बोलणाऱ्यांवर त्यांचे हे अनंत उपकार आहेत. रेड्यावर मारलेल्या चाबकाचा वळ ज्ञानेश्वरांच्या पाठीवर उठला. भूतमात्राबद्दल असा त्यांना कळवळा होता. अशा कारुण्याने भरलेल्या हृदयांतून ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी प्रकट केली. ज्ञानेश्वरांची गोडगोड भाषा मला चाखावयास मिळाली याची मला धन्यता वाटते, कृतार्थता वाटते. धन्य ही मराठी भाषा, असें वाटतें! याचा अर्थ इतर भाषांबद्दल यत्किंचित्‌हि उणेपणा माझ्या मनांत आहे असें समजूं नये. ज्ञानेश्वरांची गोड भाषा माझ्या तोंडांत वसावी म्हणून पुन्हा मला जन्म प्राप्त झाला तरी धन्यता वाटेल.

—विनोबा.

☆

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ